| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २८६ वा | शुक्रवार, दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# रेपो दरात बदल नाही, कर्ज महाग होणार नाही

## आरबीआयने व्याजदर ५.२५% वर कायम ठेवला; २०२५ मध्ये चार वेळा १.२५% कपात

**मुंबई/प्रतिनिधी** : यावेळी रेपो दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तो ५.२५% वर कायम ठेवण्यात आला आहे. म्हणजेच, कर्ज महाग होणार नाही आणि तुमचा एचख देखील वाढणार नाही. आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज ६ फेब्रुवारी रोजी मॉनिटरी पॉलिसी कमिटीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया म्हणजेच, आरबीआयने डिसेंबरमध्ये व्याजदर ०.२५% ने कमी करून ५.२५% केले होते. आरबीआय ज्या दराने बँकांना कर्ज देते, त्याला रेपो दर म्हणतात. जेव्हा आरबीआय रेपो दर कमी करते, तेव्हा बँकांना स्वस्त कर्ज मिळते आणि ते हा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवतात.

- **फेब्रुवारी २०२५ मध्ये व्याजदर ६.५% वरून ६.२५% पर्यंत कमी केले होते.**
- **मॉनेटरी पॉलिसी कमिटीने ही कपात सुमारे ५ वर्षांनंतर केली होती.**
- **दुसऱ्यांदा एप्रिलमध्ये झालेल्या बैठकीतही व्याजदर ०.२५% ने कमी करण्यात आला.**
- **जूनमध्ये तिसऱ्यांदा आरबीआय ने दरांमध्ये ०.५०% कपात केली होती.**
- **डिसेंबरमध्ये ०.२५% च्या कपातीनंतर व्याजदर ५.२५% वर आले होते.**

आरबीआयच्या मते, सध्या महागाईची स्थिती दिलासादायक आहे. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितले की, आर्थिक वर्ष २०२६ साठी किरकोळ महागाई दर २.१% राहण्याचा अंदाज आहे.



- **आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत (Q1) महागाई दर ४% राहण्याचा अंदाज आहे.**
- **दुसऱ्या तिमाहीत (Q2) महागाई दर ४.२% राहू शकतो.**
- **आर्थिक वर्ष २०२६ च्या चौथ्या तिमाहीसाठी (Q4) हा अंदाज ३.२% वर्तवण्यात आला आहे.**

या आकडेवारीवरून असे सूचित होते की, जरी थोड्या काळासाठी किमतींमध्ये थोडी वाढ होऊ शकते, तरी एकूण महागाई आरबीआयने निश्चित केलेल्या मर्यादेतच राहील.

मल्होत्रा यांनी यावरही भर दिला की, महागाईचा दबाव सध्या कमी आहे. केवळ मौल्यवान धातूंच्या बाबतीत थोडा परिणाम दिसत आहे, कारण जागतिक स्तरावर त्यांच्या किमतींमध्ये चढ-उतार कायम आहे. बाकीच्या बहुतेक वस्तूंसाठी किमती नियंत्रणात आहेत.

पुढील योजनेबद्दल ते म्हणाले की, एप्रिलमध्ये येणाऱ्या पुढील धोरणात्मक निवेदनात आरबीआय संपूर्ण वर्षासाठी सीपीआय महागाई दराचा अंदाज सादर करेल. तोपर्यंत, नवीन मालिकेअंतर्गत अधिक डेटा देखील उपलब्ध होईल.

### दर दोन महिन्यांनी होते आरबीआयची बैठक

मॉनेटरी पॉलिसी कमिटीमध्ये ६ सदस्य असतात. यापैकी ३ आरबीआयचे असतात, तर उर्वरित केंद्र सरकारद्वारे नियुक्त केले जातात. आरबीआयची बैठक दर दोन महिन्यांनी होते. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मॉनेटरी पॉलिसी कमिटीच्या एकूण ६ बैठका झाल्या. पहिली बैठक ७-९ एप्रिल २०२५ रोजी झाली होती.

### रेपो रेट काय आहे, यामुळे कर्ज कसे स्वस्त होते?

आरबीआय ज्या व्याजदराने बँकांना कर्ज देते, त्याला रेपो रेट म्हणतात. रेपो रेट कमी झाल्याने बँकांना कमी व्याजदराने कर्ज मिळेल. बँकांना कर्ज स्वस्त मिळाल्यास, ते अनेकदा याचा फायदा ग्राहकांना देतात. म्हणजे, बँका देखील त्यांचे व्याजदर कमी करतात.

### रिझर्व्ह बँक रेपो दर वाढवतो आणि कमी करतो का?

कोणत्याही मध्यवर्ती बँकेकडे धोरणात्मक दराच्या (पॉलिसी रेट) स्वरूपात महागाईशी लढण्याचे एक शक्तिशाली साधन आहे. जेव्हा महागाई खूप जास्त असते, तेव्हा मध्यवर्ती बँक धोरणात्मक दर वाढवून अर्थव्यवस्थेतील पैशाचा प्रवाह (मनी फ्लो) कमी करण्याचा प्रयत्न करते.

धोरणात्मक दर जास्त असेल तर बँकांना मध्यवर्ती बँकेकडून मिळणारे कर्ज महाग होईल. त्या बदल्यात बँका त्यांच्या ग्राहकांसाठी कर्ज महाग करतात. यामुळे अर्थव्यवस्थेतील पैशाचा प्रवाह कमी होतो. पैशाचा प्रवाह कमी होतो तेव्हा मागणीत घट होते आणि महागाई कमी होते.

त्याचप्रमाणे, जेव्हा अर्थव्यवस्था वाईट टप्प्यातून जाते तेव्हा पुनरुज्जीवनासाठी पैशाचा प्रवाह वाढवण्याची गरज असते. अशा परिस्थितीत मध्यवर्ती बँक धोरणात्मक दर कमी करते. यामुळे बँकांना मध्यवर्ती बँकेकडून मिळणारे कर्ज स्वस्त होते आणि ग्राहकांनाही स्वस्त दरात कर्ज मिळते.

# देशात पुन्हा 'बर्ड फ्लू'ची एन्ट्री; केंद्र सरकारकडून सतर्कतेचा इशारा

**चेन्नई/वृत्तसंस्था:** चेन्नईमध्ये गेल्या काही दिवसांत अत्यंत घातक H5N1 विषाणूने अंदाजे १,००० ते १,५०० कावळ्यांचा मृत्यू झाला आहे. अड्यार, वेलाचेरी, तिरुवनमियूर आणि ईस्ट कोस्ट रोड या परिसरांमध्ये मोठ्या प्रमाणात बर्ड फ्लूचा संसर्ग पसरला आहे. तामिळनाडू सरकारने हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तातडीने पावले उचलत जनतेसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. केंद्र सरकारने देखील राज्याला प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक तीव्र करण्याचे आवाहन केले आहे.

विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी, जैव-सुरक्षा नियमांनुसार मृत कावळे आणि कुक्कुटपालनातील पक्ष्यांचे अवशेष जाळून टाकण्याचे किंवा जमिनीत खोलवर गाडण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. नागरिकांनी मृत पक्ष्यांना स्पर्श करू नये किंवा त्यांना हाताळू नये आणि कोठेही मृत पक्षी आढळल्यास तातडीने स्थानिक प्रशासनाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### केंद्रीय मंत्रालयाचे तामिळनाडू सरकारला पत्र

चेन्नईच्या अड्यार भागातून घेतलेल्या नमुन्यांमध्ये बर्ड फ्लूची पुष्टी झाल्यानंतर, केंद्रीय पशुसंवर्धन मंत्रालयाने तामिळनाडूच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून तातडीने सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. पत्रात म्हटले आहे की, हा विषाणू अत्यंत घातक असून तो वेगाने पसरण्याची भीती आहे. प्राणी आणि मानवी आरोग्यास असलेला धोका कमी करण्यासाठी याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. मानव आरोग्य आणि वन्यजीव अशा विविध क्षेत्रांना एकत्र घेऊन 'वन-हेल्थ' दृष्टिकोनातून या समस्येचे निराकरण करावे.

### H5N1 म्हणजे काय?

H5N1 हा इन्फ्लूएंझा 'A' विषाणूचा अत्यंत घातक प्रकार आहे जो प्रामुख्याने पक्ष्यांमध्ये, विशेषतः कुक्कुटपालन आणि रानटी पक्ष्यांमध्ये आढळतो. यालाच सामान्यतः 'बर्ड फ्लू' म्हटले जाते. पक्ष्यांमध्ये हा वेगाने पसरतो आणि यामुळे पक्ष्यांच्या मृत्यूचे प्रमाणही जास्त असते.

जरी हा प्रामुख्याने पक्ष्यांचा आजार असला तरी, दुर्मिळ परिस्थितीत तो मानवांना किंवा इतर प्राण्यांना होऊ शकतो. मानवी संसर्ग गंभीर असू शकतो, म्हणूनच अशा उद्रेकावर बारकाईने लक्ष दिले जाते.

### हा किती धोकादायक असू शकतो?

H5N1 अत्यंत धोकादायक मानला जातो, परंतु प्रामुख्याने विशिष्ट परिस्थितीत. पक्ष्यांमध्ये तो वेगाने पसरून मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचवू शकतो. मानवांमध्ये याचा संसर्ग दुर्मिळ असला तरी, जेव्हा होतो तेव्हा तीव्र स्वरूपाचा असू शकतो. अनेक प्रकरणांमध्ये न्यूमोनियासारखे श्वसनाचे गंभीर आजार उद्भवतात आणि नियमित फ्लूपेक्षा याचा मृत्यूदर जास्त असतो.

### प्रसार रोखण्यासाठी काय करावे?

प्रशासन आणि आरोग्य विभागाने खालील खबरदारी घेण्यास सांगितले आहे:

सार्वजनिक जनजागृती मोहिम राबवणे आणि कावळे, रानटी पक्षी व कुक्कुटपालनातील पक्ष्यांच्या मृत्यूवर लक्ष ठेवण्यासाठी सर्वेक्षण तीव्र करणे.

मृत पक्ष्यांचे शवविच्छेदन उघड्यावर न करता त्यांचे नमुने प्रयोगशाळेत पाठवणे. उर्वरित अवशेष जाळून टाकणे किंवा खोलवर पुरणे.

वन्यजीव रक्षकांनी पक्ष्यांच्या मृत्यूची त्वरित माहिती देणे अनिवार्य आहे.

मृत पक्ष्यांना स्पर्श करू नका. स्पर्श झाल्यास ग्लोव्हज वापरा आणि हात स्वच्छ धुवा. कत्तलखान्यातील कचरा उघड्यावर टाकू नका जेणेकरून रानटी पक्षी तिथे येणार नाहीत.

फार्ममध्ये बाहेरील व्यक्तींच्या प्रवेशावर बंदी, कामगारांच्या हालचालींवर मर्यादा आणि उपकरणांचे नियमित निर्जंतुकीकरण करणे आवश्यक आहे.


जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुका - २०२६

मतदार बंधू- भगिनींनो,
आपलं
एक मत जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी (गट)
आणि
एक मत पंचायत समिती निर्वाचक गणासाठी (गण)
अवश्य द्या!

मतदान यंत्रावरील (बीयू) मतपत्रिकांचे रंग

जि. प. गटाची मतपत्रिका असेल पांढऱ्या रंगाची

पं. स. गणाची मतपत्रिका असेल गुलाबी रंगाची



(उमेदवारांची संख्या जास्त असल्यास आवश्यकतेनुसार एकपेक्षा अधिक मतदान यंत्रांचा (बीयू) वापर करण्यात येतो)

मतदान दि. ०७ फेब्रुवारी २०२६ | वेळ - सकाळी ७:३० ते सायं. ५. ३०

मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी 'मताधिकार' मोबाईल ॲप आणि https://mahasecvoterlist.in या संकेतस्थळाची सुविधा

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

MaharashtraSEC

कर मतदान... सांगतंय संविधान!

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## मोबाईलच्या गेमच्या नादात जीव गमविला

मोबाईलचा वापर जसा चांगला आहे तसा वाईट ही आहे. अधिक तर याचा परिणाम मोठा आहे. हे भारतीयांना कळून येत नाही. सर्वाधिक नुकसान हे आपल्या मुलाबाळाचे होत आहे. मुले मोबाईलच्या आहारी जावून वेडी होत आहेत. मानसिक संतुलन बिघडले जात आहे. अनेक ठिकाणी जेवताना मोबाईल पाहून जेवन चालू असल्याचे चित्र पाहावयास मिळते. अनेक ठिकाणी मुले रडतात म्हणून आई मोबाईल हाती देतात. त्यापासून किती धोका आहे. डोळ्याची खराबी होते. आवाजाचा परिणाम दिसून येतो. मुळात मोबाईल मुलांच्या हाती देणे चुकीचे आहे हे पालकांना कधी समजणार. मोबाईलवर गेम खेळण्याची सवय लावली. कोरियन गेमच्या नादात तीन मुलींचा जीव घेतला, एवढे भयावह असे गेम आता निघाले आहे. पालकाचे किंचीतही दुर्लक्ष झाले तर मोठी किंमत चुकवावी लागते. हे लक्षात घेतले पाहिजे. कोरियन गेमचे जीवंत उदा.कडे दुर्लक्ष करून चालणार नाही. घरातील मोठयांनी म्हणजे वडीलधाऱ्यांनी आता लक्ष द्यावे, कारण कोरियन लव्ह हा गेम कोरियन पॉप कल्चर (के-पॉप), के-ड्रामा आणि व्हर्च्युअल डेटिंग थिम्सवर आधारित ऑनलाइन टास्क देणारा गेम आहे. हे गेम्स मोबाईल ॲप्स किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे चालतात, जिथे खेळाडू 'व्हर्च्युअल लव्हर' किंवा अज्ञात वापरकर्त्यांशी संवाद साधतात. हे अज्ञात लोक कोरियन शैलीत रोमँटिक मेसेज पाठवतात आणि रोजचे काही टास्क देतात. सुरुवातीच्या टप्प्यात ही कामे निरुपद्रवी वाटतात. सुरुवातील सतत चॅटिंग करणे, स्वतःचे फोटो पाठवणे किंवा मेसेज लिहिणे यांसारखे टास्क दिले जातात. कालांतराने हे टास्क अधिकाधिक वैयक्तिक आणि टोकाचे होत जातात. या गेमच्या काही टास्कमध्ये स्वतःला इजा करून घेण्यास प्रवृत्त केले जाते आणि शेवटचा टास्क मृत्यूशी संबंधित असल्याचे सांगितले जाते. तपास अधिकाऱ्यांच्या मते, या गेमची रचना 'ब्लू व्हेल' चॅलेंजसारखीच आहे. या गेममध्येही ५० आव्हानात्मक टास्कनंतर शेवटी आत्महत्या करण्यास भाग पाडले जात असे. मिळालेल्या माहितीनुसार, बहिणींच्या फोनच्या प्राथमिक तपासणीत लॉकडाऊनच्या काळापासून त्यांना गेमचे दीर्घकालीन व्यसन असल्याचे दिसून येते. या मुली गेमच्या माध्यमातून भावनिकरित्या जोडल्या गेल्या होत्या आणि शेवटचा टास्क पूर्ण करण्याचा भाग म्हणून त्यांनी हे पाऊल एकत्र उचलले असावे, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. हा गेम इंटरनेटवर सहज कुठेही सापडू शकतो. मुले अनेकदा तो घरी डाऊनलोड करतात आणि अनोळखी व्यक्ती किंवा 'ऑटोमेटेड चॅटबॉट्स'शी संवाद साधतात. तज्ज्ञांचा इशारा आहे की, हे गेम्स मुलांमध्ये एक प्रकारचे भावनिक अवलंबित्व निर्माण करतात. परिणामी मुलांना आभासी जग आणि वास्तव यातील फरक ओळखणे कठीण होते. आलिकडे मोबाईलचा वापर जर व्यवस्थित केला नाही. चुकीचा मार्ग आवलंबला तर मोठी किंमत मोजावी लागते. चॅटींग तर महाभयंकर घात करू शकते. अनेकांचे जीवन उद्धस्थ होताना दिसून येत आहेत. नको त्यांचे फोटो जोडून ते परत मोबाईलवर टाकले जातात. एखाद्याला जीवनातून उठविण्याचे ठरविले तर सहज बरबाद केले जाण्याचा हा सोपा मार्ग आहे. जीवनात चांगले मार्गापेक्षा बरबादीचा मार्ग सोपा आहे असे एका मोठ्या संन्यासाचे वक्तव्य आहे. दररोज काम सोडून मोबाईलचे रिल पहात बसावे. तासनतास मोबाईल पाहाणे म्हणजे आपोआप बरबादीस सुरवात होते. काम नको, कमविण्याकडे दुर्लक्ष झाले की, मोबाईलमधील रिल पाहाण्यात बरबादी अटळ आहे. कोणताही गेम हा सत्यनाश करणारा आहे. वेळीच पालकाने सावध झाले पाहिजे. वेळीच पालकाने पाल्याकडे लक्ष दिले पाहिजे. मुले रडतात म्हणून हाती मोबाईल देणे अतिषय चुकीचे आहे. मोबाईलच्या नादात मुले रोगी बनत आहेत. मैदानी खेळापासून दूर जात आहेत. शरिर मोठे व डोळ्यास मोठ्या काचेचा चष्म लागत आहे. शाळेच्या गेटवर सहज नजर टाकल्यास मुला-मुलींची जाडी वाढलेली दिसून येते. हे घातक आहे. लहान वयात हृदयाचा झटका, मधुमेहसारखा घातक रोगास बळी पडत आहेत. त्यामुळे मोबाईलाचा कमी पावर केला तर ठिक अधिक केला अतिरेक केला तर मोठे नुकसान अटळ आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. मोबाईलवरील गेम असतील तर ते पालकाने उघडविले पाहिजे. घातक मोबाईलचा अधिक वापर ठरत आहे हे तीन बहिणींच्या आत्महत्त्येवरून सहज लक्षात येते. त्यामुळे पालकांनी वेळीच लक्ष दिले पाहिजे. पालकांनी सावध वागले पाहिजे. ग्रामीण भागात घरात स्वच्छालय नाही मात्र प्रत्येकांच्या हाती मोठ्या किंमतीचा मोबाईल आहे हे योग्य नाही. कुठलाही अतिरेक हा घातक हावू शकतो. त्यामुळे अतिरेक मोबाईलचा कमी कसा होईल याचा विचार केला पाहिजे. मुलाकडून मोबाईल कसा काढून घ्यावा ही मोठी समस्या आहे. मुला-मुलींकडून मोबाईल काढून घेणे अशक्यक बाब आहे. मोठ्या चतुराईने मोबाईल काढून घेणे काळाची गरज आहे. मोबाईलच्या अतिवापराने मुलांचे जीवन बरबाद होताना दिसून येत आहे. विविध गेमच्या मागे लागून तासानतास यात गुंतले जात आहे. हे आरोग्यास हानीकारक आहे. आलिकडे पालक हातबल झाल्याचे दिसून येत आहेत. यावर उपाय आई व वडील यांनी दोघांनी मात केली पाहिजे. एकाने समजावून सांगून तर दुसऱ्याने रागवुन मोबाईल काढून घेतला पाहिजे. परिक्षानंतर मोबाईल हाती देवू असे सांगून मुलांकडून कशाप्रकारे मोबाईल काढून घेता येईल याचा विचार करावा. नसता आगामी काळात मुले बरबाद होण्याचे कारण मोबाईल असू शकेल. कोरियन लव्ह गेम हा जीव घेवू शकतो तर इतर गेम किती भयानक असतील याचा विचार केलेला बरा. मुळात मोबाईल मुलांकडे देणे चुकीचे आहे. कशासाठी देता याचा विचार करावा. जी बाब योग्य नाही. वाईट आहे. विनाशकारी आहे तीचा वापर नको. मुलांना कशासाठी मोबाईल हाती द्यावयाचा याचा विचार करावा. नको ते प्रकार उघड होताना दिसून येत आहेत. तसे पालकांनी पाल्याकडील मोबाईल हा घातक बाब आहे हे माहिती आहे. तरी त्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे कोरियन लव्ह गेमने तीन निष्पाप मुलींचा जीव घेतला आहे. यावरून आपले मुले सुखरूप, आनंदी व आधारम्हणून दिर्घ काळ पाहावयाचे झाले तर वेळीच मोबाईल मुला व मुलींच्या हातून कसा काढून घेता येईल याचा विचार करावा.

# ऊर्जा परिवर्तनातील कामगिरी; महावितरणला हरित ऊर्जा शिखर परिषदेत मानाचा पुरस्कार




**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांशी सुसंगत राहून महावितरणकडून हरित ऊर्जेला प्राधान्य देण्यात येत आहे. स्वस्त व शाश्र्वत वीजपुरवठ्यासाठी महावितरणने अपारंपरिक ऊर्जेला प्राधान्य देत वीज खरेदीच्या दीर्घकालीन करारांमध्ये तब्बल ६५ टक्के अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केला आहे. यासह इतर कामगिरीची दखल घेऊन १४ व्या हरित ऊर्जा शिखर परिषदेत महावितरणला हरित ऊर्जा व ऊर्जा कार्यक्षमता उत्कृष्टता पुरस्काराने गौरविण्यात आले.

नवी दिल्ली येथे बुधवारी (दि. ४) इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने आयोजित या शिखर परिषदेचे अध्यक्ष व केंद्रीय ऊर्जा सचिव (सेवानिवृत्त) श्री. अनिल राजदान यांच्याहस्ते महावितरणचे कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर तसेच श्री. मोहन मुजूमदार व श्री. शुभम चोरमले यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

राज्याच्या वीज क्षेत्रासाठी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. त्यामुळे नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होईल. तसेच सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने सर्व वर्गवारीचे वीज दर कमी होत जाणार आहे.

या नियोजनाला अनुसरून महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ७२ हजार ९१८ मेगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ ट्क्के) अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे.

ऊर्जा परिवर्तनामध्ये प्रामुख्याने सौर ऊर्जा क्षेत्रात महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी आतापर्यंत ३५२० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. त्यातून ९ लाखांवर शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे. तर देशात सर्वाधिक ८ लाखांवर सौर कृषिपंप कार्यान्वित झाले आहे. यासह प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत आतापर्यंत राज्यात ४ लाख ४३ हजारांवर घरगुती ग्राहकांकडे १७३३ मेगावॅट क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहे व त्यांचे मासिक वीजबिल देखील शून्यवत झाले आहे.

# तुमच्या वयापेक्षा तुमच्या मेंदूचे वय वेगाने वाढत आहे का? 'ही' पाच लक्षणे सांगू शकतात धोक्याची घंटा

वय वाढत असताना मेंदूमध्ये काही बदल होणं सामान्य आहे. असं असताना जर हे बदल खूप लवकर झाले त ते तुमच्या स्मरणशक्ती, लक्ष, मन:स्थिती आणि अगदी दैनंदिन जीवनावर देखील परिणाम करू शकतात. ही सुरूवातीची लक्षणे लवकर ओळखली गेली तर मेंदूचा बिघाड मोठ्या प्रमाणात रोखता येऊ शकतो. कॉर्नेल विद्यापीठाचे डॉ. वसिल इलिओपौलोस मेंदू आवश्यकतेपेक्षा जास्त वेगाने वृद्ध होत असल्याचे दर्शविणारी चिन्हे सांगितली आहेत. तर मग जाणून घेऊया मेंदूचे एजिंग म्हणजे नेमकं काय आणि त्याची काय लक्षणं आहेतष्ठ

झोपेच्या समस्या आणि सतत थकवा

मेंदूच्या एजिंगचे पहिले लक्षण म्हणजे झोपेचा अभाव. कधीकधी थकवा जाणवत असूनही तुम्हाला झोप येत नाही किंवा तुम्ही रात्री वारंवार जागे होता. झोप मेंदूसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. कारण झोप ही स्वत:ची दुरूस्ती करण्यासाठी, आठवी एकत्रित करण्यासाठी आणि अनावश्यक माहिती काढून टाकण्यासाठी लागणारा वेळ आहे. संशोधनातून असे दिसून ले की, कमी झोपेमुळे विसरणे, एकाग्रतेचा अभाव आणि मेंदूतील धुके यासारखी लक्षणे उद्भवू शकतात. ही सर्व लक्षणे आहेत की मेंदू झोपेचे नियमन करण्याची क्षमता गमावत आहे.

बोलताना शब्द न आठवणे

कधीकधी एखादा शब्द आठवत नसणे हे अगदी सामान्य आहे. मात्र, जर ते दररोज घडत असेल तर ते मेंदूच्या एजिंगचे लक्षण असू शकते. अनेकदा लोक बोलता बोलता म्हणतात की, अरे नाव माझ्या तोंडावर आहे पण मला आठवत नाही. डॉ. वॅसिली यांनी याला टंग ऑफ द टंग सिंड्रोम म्हटले आहे. जर सामान्य शब्द, नावे किंवा परिचित चेहरे वारंवार लक्षात ठेवण्यात अडचण येत असेल तर ते स्मरणशक्ती आणि शिकण्यासाठी जबाबदार असलेल्या मेंदूचे भाग कमकुवत होत असल्याचे लक्षण असू शकते.

ओळखीच्या ठिकाणीच हरवणे

कधीकधी तुम्ही रस्ता विसरणं ठीक आहे, पण जर तुमचा स्वत:चा रोडचा रस्ता किंवा ओळखीचा मार्ग तुम्हाला अनोळखी वाटत असेल तर ते चिंतेचं कारण आहे. हे मेंदूच्या त्या भागात समस्या असल्याचे लक्षण असू शकते जे आपल्याला दिशानिर्देश आणि ठिकाणे लक्षात ठेवण्यास मदत करते. दीर्घकालीन ताण, मेंदूचा कमी वापर आणि वयानुसार येणारे बदल ही समस्या वाढवू शकतात. नवीन गोष्टी शिकणे, कोडी सोडवणे किंवा मेंदूला सक्रिय ठेवणाऱ्या हालचालींमध्ये गुंतणे मदत करू शकते.

अचानक मूड बदलणे

अस्पष्ट चिडचिडेपणा, अस्वस्थता किंवा अचानक मूड बदलणे हे मेंदूच्या एजिंगचे लक्षण असू शकते. लोक अनेकदा छोट्या छोट्या गोष्टींवरून अस्वस्थ होतात किंवा रागावतात किंवा बऱ्याचदा का असं होतं ते कळतंच नाही. हे मेंदूतील रासायनिक बदल आणि जळजळ यामुळे होते. याचा मेंदूवर अकाली परिणाम होऊ शकतो.

प्रखर प्रकाश किंवा आवाजामुळे होणारे त्रास

प्रखर प्रकाश, टीव्हीचा आवाज किंवा कोणताही मोठा आवाज अचानक अधिक त्रासदायक झाला तर तो मेंदूच्या नसा अतिसंवेदनशील झाल्याचे लक्षण असू शकते. तज्ज्ञ सांगतात की, अशी संवेदनशीलता बहुतेकदा मेंदूतील जळजळ किंवा न्यूरोट्रान्समीटरच्या व्यत्ययामुळे होते. ते मेंदूच्या एजिंगचे आणखी एक सुरूवातीचे लक्षण आहे.

यावर काय उपाय करू शकतो?

जर ही लक्षणे लवकर ओळखता आली, तर निरोगी मेंदू राखणे शक्य आहे. नियमित व्यायाम, अँटीऑक्सिडंट्सयुक्त अन्न, चांगली झोप, मित्र आणि कुटुंबांशी भेटीगाठी आणि मेंदूला सक्रिय ठेवणाऱ्या हालचालींमुळे मेंदू एजिंगला बळी पडणार नाही. गरज पडल्यास तज्ज्ञांकडून तपासणी, मेंदूची चाचणी आणि योग्य उपचार किंवा पूरक आहारदेखील मदत करू शकतात.

# ९ फेब्रुवारीपर्यंत रंगणार स्पर्धांचा थरार: हार-जित विसरा, खिलाडूवृत्ती जोपासा; अधिष्ठाता डॉ. ठोंबरे



**लातूर/प्रतिनिधी :** खेळ ही केवळ शारीरिक स्पर्धा नसून ती संघभावना आणि राष्ट्रीय एकता वृद्धिंगत करणारी महत्त्वाची प्रक्रिया आहे. जय-पराजयापलीकडे जाऊन खिलाडूवृत्तीने खेळणे हेच खऱ्या खेळाडूचे लक्षण आहे, असे प्रतिपादन कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी केले. निमित्त होते, लातूर येथील कृषी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या औचित्याने आयोजित क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटनाचे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्र मणि आणि शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार यांच्या मार्गदर्शनाखाली या भव्य क्रीडा महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उदघाटन राष्ट्रपती पदक प्राप्त सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक सय्यद रहमान यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून करण्यात आले. ९ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या सप्ताहात क्रिकेटपासून ते रस्सीखेचपर्यंत विविध मैदानी व बुद्धिबळासारख्या बौद्धिक खेळांची मेजवानी रंगणार आहे.

याप्रसंगी डॉ. व्यंकट जगताप, जिमखाना उपाध्यक्षा डॉ. ज्योती देशमुख, डॉ. विजय भामरे, डॉ. राजेश शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटनानंतर लगेचच विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या क्रिकेट स्पर्धांना सुरुवात झाली. या सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळणार असून, संपूर्ण परिसर बुद्धिबळासारख्या झाला आहे. डॉ. सचिन पडवळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. अनंत शिंदे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवरायांच्या प्रेरणेतून क्रीडा महोत्सव सुरू छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराजांच्या युद्धकौशल्यातून आणि नियोजनातून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातही नाव कमवावे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या सप्ताहादरम्यान केवळ शारीरिक खेळच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक स्पर्धांची मेजवानीही रंगणार आहे.

मैदानावर विविध खेळांचा थरार, अनेकांचे लक्ष या क्रीडा सप्ताहात विद्यार्थ्यांच्या कौशल्याची कसोटी लागणार आहे. यामध्ये प्रामुख्याने क्रिकेट, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो, बॅडमिंटन, टेबल टेनिस, रस्सीखेच, फुटबॉल आणि बुद्धिबळ अशा वैविध्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

अभ्यासाच्या व्यापातून थोडा विसावा घेत विद्यार्थी मैदानावर आपला घाम गाळताना दिसत आहेत. सप्ताहात क्रिकेटपासून ते रस्सीखेचपर्यंत स्पर्धा लक्ष वेधतात.

## आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे कच्चे खजूर, जाणून घ्या रोज खाण्याचे फायदे



दररोज गोड पदार्थ खाण्याची इच्छा कमी करण्यासाठी खजूर हा सर्वात आरोग्यदायी पर्याय मानला जातो. खजूर जवळपास सर्वजण खातात. पण तुम्ही कधी कच्चे खजूर खाल्ले आहे का. कच्चे खजूर फक्त चवीलाच स्वादिष्ट नाहीत तर त्याचे फायदे पिकलेल्या खजूरांपेक्षाही जास्त आहेत.

कच्च्या खजूरमध्ये कॅल्शियम, फायबर, पोटॅशियम, कार्बोहायड्रेट्स, हेल्दी फॅट्स, फायबर, प्रोटीन, मँगनीज, मॅग्नेशियम, फॉस्फरस, जस्त, व्हिटॅमिन्स बी६, ए आणि के आणि लोह यासारखे अनेक पोषक घटक असतात. हे सर्व पोषक घटक शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जातात. म्हणूनच आपण कच्चे खजूर खाण्याचे फायदे जाणून घेऊया

वात आणि पित्तासाठी फायदेशीर-

आयुर्वेदानुसार, शरीरातील वात आणि पित्त संतुलित नसेल तर त्यामुळे अनेक आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. कच्चे खजूर खाल्ल्याने शरीरात वात आणि पित्त संतुलित राहण्यास मदत होते. म्हणून, तुम्ही त्यांचे सेवन नक्कीच करावे.

केस गळती रोखते

कच्च्या खजूरमध्ये व्हिटॅमिन बी६ असते, जे केस गळती रोखते. प्रदूषण, जीवनशैलीतील बदल आणि आहारातील बदलांमुळे ज्यांचे केस रुक्ष, निस्तेज आहेत त्यांना कच्च्या खजूर खाण्याचा सल्ला दिला जातो. केसांच्या समस्या दूर करण्यासाठी कच्च्या खजूरचे मास्क देखील वापरले जाऊ शकतात.

साखर नियंत्रित करते

कच्च्या खजूरमध्ये पिकलेल्या खजूरांपेक्षा खूपच कमी साखर असते. मधुमेहाच्या रुग्णांसाठी त्यांचे सेवन फायदेशीर आहे. त्यांचे सेवन केल्याने शरीराला ग्लुकोज, फ्रुक्टोज आणि सुक्रोज सारख्या नैसर्गिक साखरे मिळतात. यामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहण्यास मदत होते.

अशक्तपणा कमी होतो-

अशक्तपणा असलेल्यांसाठी कच्चे खजूर देखील खूप फायदेशीर आहे. कच्च्या खजूरमध्ये लोह भरपूर असते, जे रक्त उत्पादन वाढविण्यास मदत करते. अशक्तपणावर मात करण्यासाठी, कच्चे खजूर दुपारच्या जेवणाच्या वेळी किंवा संध्याकाळी सेवन केले जाऊ शकतात. कच्चे खजूर दुधासोबत देखील खाता येते.

## कॉन्टॅक्ट लेन्स घालताना काय काळजी घ्यावी आणि किती वेळ घालावे? जाणून घ्या



आजकाल बहुतेक लोकांना लहान वयातच डोळ्यांची दृष्टी अंधुक होण्याची समस्या येत आहे. ज्यामुळे त्यांना लहान वयातच चष्मा लागतो. अनेकांना चष्मा घालायला आवडत नाही. अशा परिस्थितीत चष्मा असलेले लोक कॉन्टॅक्ट लेन्स घालू शकतात. डोळे हे शरीराच्या नाजूक अवयवांपैकी एक आहेत. म्हणून, कॉन्टॅक्ट लेन्स घालताना काही गोष्टींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

कॉन्टॅक्ट लेन्स घालताना योग्य काळजी न घेतल्यास डोळ्यांशी संबंधित समस्या वाढू शकतात. तर, आपण जाणून घेऊया, कॉन्टॅक्ट लेन्स घालताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. तसेच कॉन्टॅक्ट लेन्स किती वेळ घालावे

कॉन्टॅक्ट लेन्स किती वेळ घालावे-

तज्ञांच्या मते, कॉन्टॅक्ट लेन्स ९ तासांपर्यंत घालता येतात. यापेक्षा जास्त वेळ घालणे टाळा. जास्त वेळ लेन्स घातल्याने डोळ्यांमध्ये ऑक्सिजनची कमतरता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे डोळ्यांच्या संसर्गाचा धोका वाढतो.

कॉन्टॅक्ट लेन्स घालताना कोणती काळजी घ्यावी?

हाताची स्वच्छता-

कॉन्टॅक्ट लेन्स घालण्यापूर्वी किंवा काढण्यापूर्वी, तुमचे हात साबणाने चांगले धुवा आणि नंतर ते टॉवेलने चांगले पुसून घ्या. घाणेरड्या किंवा ओल्या हातांनी लेन्सला स्पर्श केल्याने डोळ्यांच्या संसर्गाचा धोका वाढतो, ज्यामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. तसेच तुमच्या डोळ्यांना वारंवार स्पर्श करणे टाळा.

मेकअप करताना काळजी घ्या-

कॉन्टॅक्ट लेन्स घालणाऱ्या महिलांनी मेकअप करण्यापूर्वी ते लेन्स लावावेत आणि मेकअप काढल्यानंतर ते काढून टाकावेत. लेन्स घातल्यास पावडर मेकअपऐवजी क्रीम मेकअप वापरणे देखील चांगले आहे. जर तुम्हाला डोळ्यांचा त्रास होत असेल तर लेन्स घालणे टाळा.

डोळ्यांच्या समस्या-

कधीकधी, कॉन्टॅक्ट लेन्स घालताना लोकांना खाज सुटणे, जळजळ होणे आणि लालसरपणा जाणवतो. अशा परिस्थितीत, ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि ते घालणे टाळा. कॉन्टॅक्ट लेन्स घालणाऱ्यांनी दर ६-८ महिन्यांनी त्यांचे डोळे तपासले पाहिजेत.

नखे स्वच्छ ठेवा-

कॉन्टॅक्ट लेन्स घालण्यापूर्वी आणि काढण्यापूर्वी तुमचे नखे स्वच्छ आणि लहान ठेवल्याने डोळ्यांच्या समस्या टाळता येतात. लांब नखांमुळे लेन्स घालणे आणि काढणे कठीण होऊ शकते. आणि त्यामुळे डोळ्यांना दुखापत आणि संसर्ग होण्याचा धोका देखील वाढतो.

# हृदयविकाराचा झटका आणि त्यावरील उपाय



हृदयविकाराचा झटका (क्शरीीं -ीींरलज्ञ) ही एक गंभीर वैद्यकीय आणीबाणी आहे. याची प्रमुख लक्षणे म्हणजे छातीत तीव्र वेदना, दाब, घट्टपणा किंवा अस्वस्थता, जी डाव्या हातात, जबड्यात किंवा पाठीत पसरू शकते. तसेच, धाप लागणे, घाम येणे, चक्कर येणे, मळमळ आणि छातीत धडधडणे ही लक्षणे देखील दिसतात.

हृदयविकाराच्या झटक्याची प्रमुख लक्षणे:

छातीत अस्वस्थता/वेदना: छातीच्या मध्यभागी किंवा डाव्या बाजूला दाबल्यासारखे, जड वाटणे किंवा पेटके येणे.वेदना पसरणे: ही वेदना डावा हात, मान, जबडा, पाठ किंवा पोटात पसरू शकते.श्वास घेण्यास त्रास: धाप लागणे, श्वास कमी पडणे, विश्रांती घेतल्यावरही श्वास घेण्यास अडथळा निर्माण होणे.

अति घाम येणे: अचानक आणि खूप घाम येणे.

चक्कर येणे आणि मळमळ: अचानक चक्कर येणे, अशक्तपणा जाणवणे, मळमळ किंवा उलटी होणे.

हृदयाची धडधड: हृदयाचे ठोके अनियमित होणे किंवा छातीत धडधड वाढणे.

हे लक्षात ठेवा:

काही व्यक्तींना (विशेषतः स्त्रिया, मधुमेह असलेले रुग्ण) छातीत वेदना न होता केवळ खूप थकवा, पाठदुखी किंवा अपचन असे सौम्य लक्षणे दिसू शकतात.

ही लक्षणे दिसल्यास वेळ न घालवता त्वरित एम्ब्युलन्स बोलवा किंवा जवळच्या हॉस्पिटलमध्ये जा.

निरोगी हृदयासाठी आहारात फळे, भाज्या आणि कडधान्यांचा समावेश करा, दररोज ३० मिनिटे व्यायाम करा, धूम्रपान टाळा, आणि तणावमुक्त राहा. कमी मीठ, साखर आणि चरबीयुक्त पदार्थ खाणे आवश्यक आहे. वजन नियंत्रणात ठेवा आणि नियमित आरोग्य तपासणी करा.

# अप्पांची घरगुती सुरक्षाव्यवस्था

आठ वर्षांपूर्वी अप्पा रिटायर झाले. त्यानंतर त्यांच्या आयुष्यात एक प्रसंग घडला. अप्पा तो प्रसंग कधीही विसरू शकले नाहीत, विसरणार नाहीत. एका पहाटे फिरायला जाताना स्ट्रीट लाईट्स नसलेल्या ठिकाणी पाठीमागून एक दुचाकी भरधाव आली. जवळ आल्यावर त्या स्वाराला अप्पा दिसले. त्याने ब्रेक लावण्याचा प्रयास केला; पण तो छोटासा धक्का अप्पांना महाग पडला. अप्पा तोंडावर पडले. जखमा लहानसहान होत्या; पण अनेक ठिकाणी होत्या. एका पायाचा अंगठा, दोन्ही गुडघे दुखावले.

तोल सावरण्यासाठी पुढे केलेल्या हातांचे तळवे आणि मनगटे खरचटली. नशिबाने कुठे फ्रॅक्चर नव्हते; पण मुकामार लागला होता. अप्पांना बरे व्हायला पंधरा दिवस झाले. त्यानंतर त्यांनी बराच विचार करून स्वतः साठीची खास सुरक्षाव्यवस्था उभी केली.

पहाटे फिरायला जाताना पांढरा शुभ्र सदरा, पांढरा लेंगा किंवा बर्मुडा परिधान करायचे. एखाद्या ठिकाणी रस्त्यावरचा उजेड अंधुक असला तरी, पांढर्या कपड्यांमुळे चालणार्याची आकृती स्पष्ट दिसते. पायात फक्त आणि फक्त कापडी शूज. चालताना चप्पल पायातून निसटून तोल जाऊ शकतो. कापडी शूज पायातून निसटत नाहीत. त्यांचे वजन हलके असते.

चालताना मधून-मधून जमिनीकडे लक्ष द्यावे. काही ठिकाणी रस्त्यावर उंचवटा किंवा खळगा असतो. काही ठिकाणी पाण्याच्या नळाचे टोक वर आलेले असते आणि त्याला मनपा सेवकांनी किंवा कुणी छोटे कुलूप ठोकलेले असते. पदपथावरचे पेव्हरब्लॉक अनेकदा सैल झालेले किंवा निघालेले असतात. त्यात पाय अडखळून तोल जाऊ शकतो.

दुधाची पिशवी आणि वर्तमानपत्र घेण्यासाठी गळ्यातली पिशवी. म्हणजे, पिशवी धरण्यासाठी एक हात अडकून राहात नाही.चालताना भटकी कुत्री दिसली की, शक्यतो दुरून जायचे. शिवाय त्यांच्यावर उगारण्यासाठी पुरेशा लांबीची हलकी काठी किंवा खिडकीला पडदे लावण्यासाठी जे पोकळ रॉड वापरतात तसा रॉड. तो वजनाने हलका असतो. त्याच्यावर कोरलेल्या नक्षीमुळे तो हातातून निसटत नाही.

शक्यतो रस्त्याच्या उजव्या बाजूने आणि पदपथावरून चालायचे. म्हणजे, समोरून येणारे वाहन दिसेल, चालताना रस्त्याच्या कडेला कार किंवा टेंपो असेल तर, त्यांच्या जवळून जाताना सावधपणे जायचे. विश-षतः टेंपोचालकाने मागेपुढे न बघता खाडकन दरवाजा उघडला तर त्याचे टोक कानशिलाच्या वरच्या बाजूला लागून मूर्च्छा येऊ शकते. क्वचितप्रसंगी असा धक्का जिवावर बेतू शकतो. अप्पांनी यापूर्वी वर्तमानपत्रात बातमी वाचलेली आहे- एका बाईकस्वाराला कानशिलाच्या वरच्या बाजूला टेंपोच्या दाराचा जोरात धक्का लागून प्राण गमवावे लागले होते.

पहाटे, किंवा एरव्ही देखील, पायी चालणार्यांना एक समस्या नव्याने भेडसावू लाग- ली आहे. नव्या वाहनांचे दिवे (हेडलाईट्स) रात्री आणि दिवसादेखील चालू असतात. हे एलईडी दिवे अतिशय प्रखर प्रकाशझोत सोडतात. त्यामुळे रस्ता ओलांडताना डोळ्यांसमोर अंधेरी येऊन तोल जाऊ शकतो. अप्पांनी यावर उपाय शोधला आहे; पण त्यांना स्वतःला तो तुटपुंजा वाटतो. अधिक चांगला उपाय ते स्वतः शोधत आहेत. तो उपाय असा- अनेक रिक्षाचालक आणि इतर चालक वाहनाच्या मागच्या बाजूला सोनेरी-रंगीत चिकटपट्टीचा तुकडा लावतात. त्याला ते बोली भाषेत 'रेडियमची पट्टी' म्हणतात. ही रेडियमची पट्टी कामचलाऊ रिफ्लेक्टरचे काम करते. तिच्यावरचा प्रकाश परावर्तीत होऊन ती अंधारात चमकते. ही पट्टी आणून तिचे छोटे तुकडे करून अप्पांनी ते आपल्या शबनम पिशवीला, बुटांच्या मागच्या बाजूला आणि अंगठ्यांच्या वर, त्याचप्रमाणे हातातल्या काठीला चिकटवले आहेत. त्यामुळे अंधुक उजेडात देखील अप्पांची समोरून येण-ारी किंवा पाठमोरी जाणारी आकृती वाहनचालकाला सहजी दिसते.



रिफ्लेक्टरवर पडलेला प्रकाशझोत तितक्याच तीव्रतेने परावर्तीत होत असल्याने वाहनचालक आपल्या गाडीचा प्रकाशझोत सौम्य करतात किंवा गाडीचा वेग मंद करतात.

गरज पडली तर, असू द्यावा म्हणून अप्पा आपला मोबाईल सदैव जवळ बाळगतात; पण रस्त्यावर चाल-ताना कधीही मोबाईलवर बोलत नाहीत. कोणाचा फोन आलाच तर आडोशाला थांबून फोन घेतात आणि बोलून झाल्यावर मग चालायला सुरुवात करतात आणि इतर वेळी दिवसभरात बाहेर पडायचे झाले तर शक्यतो घरातील कोणाला तरी किंवा मित्राला सोबत घेऊनच बाहेर पडतात. वाहनातून उतरताना उजवीकडून उतरण्याचा प्रसंग आला तर मागच्या बाजूने वाहन येत नाही ना, याची खातरजमा करतात.

थकलेली माणसं : विजय तरवडे

# हिंचाराचारात बघ्याची भूमिका घेणारे मणिपूर सरकार

वांशिक विद्वेष व हिंसाचारात मणिपूर अनेक महिने जळत होते. तरीही केंद्र सरकारने बघ्याची भूमिका घेतली होती. आसामच्या निवडणुकीपूर्वी ईशान्येकडील या राज्यात आपली सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याचे भाजपचे प्रयत्न आहेत.

मणिपूरमध्ये भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी युमनाम खेमचंद सिंग यांची निवड करण्यात आली आहे. अर्थातच, राज्याचे ते नवे मुख्यमंत्री असतील. राज्यात राष्ट्रपती राजवट होती, ती काल उठविण्यात आली. वांशिक संघर्ष व हिंसा-चाराने ग्रस्त झालेल्या मणिपूरमध्ये पुन्हा लोकनियुक्त सरकार स्थापन करण्याच्या हालचालींना गेल्या काही आठवड्यात वेग आला होता. युमनाम सिंग यांच्या मदतीस दोन उपमुख्यमंत्री असणार आहेत. त्यापैकी एक कुकी-झो समाजातून व एक नाग समाजाचा असणार आहे. एक भाजपचा व एक मित्र पक्षातील असणार आहे. कुकी समाजाच्या नेम्चा किप्जेन यांना उपमुख्यमंत्री पद दिल्याने महिलेस स्थान दिल्याचे श्रेयही पक्ष घेऊ शकतो. ६० सदस्यांच्या मणिपूर विधानसभेत भाजपचे ३७ आमदार आ-हेत. सरकार स्थापण्यास त्यांना मित्रपक्षांची गरज नाही; पण सर्व जमातींना शांत ठेवण्यासाठी काहींना सरकारमध्ये सामावून घेणे त्यांना भाग आहे. मैतेइ समाजाचे वर्चस्व असणार्या सभागृहात इतरांकडे दुर्लक्ष झाल्याची भावनाही यामुळे दूर करता येईल. ईशान्येकडील या राज्यात चारच वर्षांपूर्वी निवडणूक





झाली होती. पुढील निवडणुकीपूर्वी सत्तेत असण्यास भाजपने प्राधान्य दिले आहे.

शांतता स्थापणे महत्त्वाचे

मणिपूरच्या खोर्यात मैतेइ तर डोंगराळ भागात कुकी समाजाचे वर्चस्व आहे. २०२३ च्या मे महिन्यात या दोन समाजात संघर्ष सुरू झाला. अल्पावधीत तो राज्यात सर्वत्र व राज्याबाहेरही पसरला. दोन्ही समाज आपल्यासाठी स्वतंत्र भागाची मागणी करू लागले. या हिंसाचारात अनेक जण मारले गेले. परिस्थिती हाताळण्यात तत्कालीन मुख्यमंत्री बिरेन सिंग यांना साफ अपयश आले. पण भाजपचे केंद्रीय नेतृत्व त्यांच्या मागे उभे असल्याचे दिसत होते. पक्षश्रेष्ठांनी त्यांना दूर केले नाही. प्रचंड जाळपोळ, हत्या, नागरिकांचे विस्थापित होणे असे होऊनही केंद्र सरकारने या घटनेवर संसदेत चर्चा घडवून आणणे टाळले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक महिने त्यावर मतही व्यक्त केले नव्हते. या काळात पक्षाच्या राज्य शाखेत बिरेन यांच्या विरोधात असंतोष निर्माण झाला. पक्षाचे अनेक आमदार दिल्लीची वारी करून बिरेन यांना दूर करण्याची मागणी करत होते. नियोजित मुख्यमंत्री युमनाम सिंग यांचाही त्यात समावेश होता. ऑक्टोबर २०२४ मध्ये पक्षाच्या १९ आमदारांनी पत्र लिहून बिरेन यांना हटवण्याची मागणी केली. तरीही केंद्र सरकारने त्यांना हटवले नाही. नॅशनल पीपल्स पार्टी या पक्षाने सरकारचा पाठिंबा मागे घेत असल्याचे २०२४ च्या नोव्हेंबर मध्ये जाहीर केले. तरीही बिरेन पदास चिकटून राहिले. याच काळात सरकारविरुद्ध अविश्वास ठराव आणण्याची तयारी काँग्रेसने केली होती. तो दाखल झाल्यास पक्षाचे अनेक आमदार त्या बाजूने मतदान करणार याची कल्पना भाजपच्या नेतृत्वास आली. छोटे राज्य असले तरी काँग्रेसमुळे तेथील सत्ता गमावली असे चित्र निर्माण होणे भाजपला परवडणारे नव्हते. कारण त्याचा परिणाम देशात झाला असता व काँग्रेसचे बळ वाढले असते. अखेर पक्षाने बिरेन यांना राजीनामा देण्यास सांगितले. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी बिरेन यांनी राजीनामा दिला आणि १३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. तरीही राज्यात सत्ता स्थापनेची धडपड पक्षाने केली.

गेल्या वर्षी मे महिन्याच्या अखेरीस काही आमदारांनी बहुमताचा दावाही केला होता. हिंसाचार उसळून सुमारे अडीच वर्षे झाल्यानंतर मोदी यांनी गेल्या वर्षी सप्टेंबर मध्ये राज्यास भेट दिली. राज्यात पुढील वर्षी निवडणूक होणे अपेक्षित आहे. तेव्हा आपली सत्ता असावी हा भाजपचा आग्रह स्पष्ट दिसत आहे. मात्र हा काळ सोपा नाही. राज्याच्या सर्व भागांत शांतता निर्माण करणे व राखणे हे मोठे आव्हान युमनाम सिंग यांच्या समोर असेल. ते गेल्या सरकारमध्ये मंत्री होते. ते मैतेइ समाजाचे असले तरी संघर्षाच्या काळात कुकी समाजाशी संपर्क साधण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. सर्व समाजांत सलोखा निर्माण करण्याचेही आव्हान नव्या सरकार समोर असणार आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

बदलत असलेली जीवनशैलीचा प्रभाव दांपत्य जीवनावर पडत आहे. हल्ली ताणावाच प्रभाव मॅरिड लाईफवर पडत असून अनेक दंपती बाळाला जन्म घालण्यास समर्थ ठरतं आहे. खानपान, राहणी आणि धावपळीच्या या काळात पुरुषांमध्ये नपुंसकत्व वाढत आहे. योग्य आहार आणि पोषणाची कमी या कारणामुळे पुरुषांची प्रजनन क्षमता प्रभावित होत आहे. अशात कमजोरीमुळे दांपत्य जीवनातील आनंद देखील हरवत आहे. तर आज जाणून घ्या नपुंसकत्वासाठी जबाबदार ५ खाद्य पदार्थांबद्दल:कॅफीन

## २ Joke — विनोद





**गोरा रंग :**

**ऐश्वर्या :** तुझ्या पतीचा हळूहळू गोरा रंग होत चाललाय याचे कारण काय?

**काजोल :** अगं, पूर्वी ते कोळशाच्या वखारीत कामाला होते. आता ते पिठाची चक्की चालवतात.

## ३ Message — संदेश



Me aapko ENGLISH ka 1 word bhejta hu,
Jise aap aage se padho ya pichhe se,
aapko aapka hi naam dikhai dega,.
-ULLU

## ४ Thought — सुविचार

ग्रंथापेक्षा अनुभव बरेच काही सांगून जातात.
– जो हर्बर्ट




**संस्कृत सुभाषित**

वीणा वंशश्चन्दनं चन्द्रभास – श्चन्द्राभासा
यौवनस्थास्तरुण्यः। नैतद्रम्यं क्षुत्पिपासातुराणां
सर्वारम्भास्तण्डुला प्रस्थमूलाः।।

अर्थ –भूक आणि तहानेने व्याकूळ झालेल्या माणसाला वीणावादन,चंद्राचे शीतल चांदणे,चंदनाचा सुगंध, चंद्रासारखा चेहरा असणाऱ्या तरुणी यांचे आकर्षण वाटत नाही. मापटेभर तांदळाच्या भाताने क्षुधा शमल्यानंतरच त्याला इतर गोष्टींमध्ये स्वारस्य वाटते.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. शासन – पण शिक्षा नव्हे!
४. तोरा, ऐट
५. अवस्था, गेलेला
७. लुच्चा, लबाड
८. ओढणी
९. शीण
११. नाउमेद करणे
१२. वचक
१४. किरकोळ दुरुस्ती
१५. अश्व
१७. आर्द्रता
१९. श्रीरामाचा पुत्र
२१. पराभव
२२. मोठी सुई
२४. मलई
२७. रखवाली
२८. समशेर
३०. अगदी आवडलेले
३२. विहिरीतून पाणी शेंदण्याचे साधन
३४. एकाग्र नजर
३५. प्रसूती सहाय्यक
३६. मुरलीधरनचा गाजलेला चेंडू
३७. चिन्ह, संकेत
३९. फुगीर, गरगरीत गोल
४१. हळू
४४. मागणारा
४६. धोका
४७. आप्त
५०. आश्रय
५१. पुरीसारखे फुगणारे
५२. टपाल
५३. पूर्वी मध्यपूर्व आशियातील प्रदेश या नावाने ओळखला जाई
५४. कर्जदार
५६. अननुभवी
५८. वायू
६०. अंग पुसण्याचे मऊ वस्त्र
६१. बाज, खाट
६२. दृष्टी
६३. पोळीचा कुरकुरीत गुजराथी अवतार
६४. धागा
६५. सागर
६६. विडा रंगवणारा एक घटक

### उभे शब्द

१. बेचव
२. हाताचा प्रहार
३. पुराणकालीन घोडागाडी
४. नुकताच आलेला
५. ढाबळ
६. धीर, बळ, उत्साह
७. आफ्रिकेत पाण्यात आढळणारा अवाढव्य प्राणी
८. बालकाला प्रथम येणारे दात
१०. सुळका
११. ओशाळलेला
१३. पाषाण
१६. डाव्या हाताने काम करणारा
१७. कंबरेत वाकलेला
१८. तुळईला आधार देणारा खांब
२०. मिरवणूक
२१. वाटसरूंसाठी केलेली पिण्याच्या पाण्याची सोय
२३. चुकीचे, अभिप्रेत नसलेले
२५. भाऊबीजेची तिथी
२६. झोपडी
२९. राख
३१. अरिष्ट
३३. मारुती
३५. मोठा चाकू
३८. केस
४०. भाकरीला हद्दपार करून जेवणात आलेला गव्हाचा पदार्थ
४२. खळगा
४३. जमीन
४५. द.म. मिरासदार-शंकर पाटील वगैरेंनी लोकप्रिय केलेला एकपात्री कलाविष्कार
४६. किल्ल्यात किंवा हवेलीत असलेली गुप्त चर्चेची जागा
४७. घोड्यांच्या पायाला ठोकलेला पत्रा
४८. मालगाडीचा डबा
४९. मेहनत
५१. सुखद थंडावा
५२. पेच, खेळी
५३अ. दसऱ्याआधीचे सलग जागरण
५४. वेदातील ेक, मुलींचे एक नाव
५५. कोनाडा
५६. रोकड
५७. रात्र
६०. संप्रदाय, विशिष्ट विचारधारा

### आडवे उत्तरे

१.सरकार ४.नक्षा ५.गत ७.पाजी ८.दुपट्टा ९.थकवा ११.खच्चीकरण १२.धाक १४.डागडुजी १५.घोडा १७.ओलावा १९.लव २१.पाडाव २२.दाभण २४.साय २७.राखण २८.तलवार ३०.मनपसंत ३२.पोहरा ३४.टक ३५.सुईण ३६.दुसरा ३७.प्रतीक ३९.टपोरा ४१.मंद ४४.याचक ४६.खतरा ४७.नातेवाईक ५०.थारा ५१.गाल ५२.डाक ५३.अरबस्तान ५४.ऋणको ५६.नवथर ५८.वात ६०.पंचा ६१.पलंग ६२.नजर ६३.खाकरा ६४.दोरा ६५.दर्या ६६.चुना

### उभे उत्तरे

१.सपक २.रट्टा ३.रथ ४.नवागत ५.गच्ची ६.तकवा ७.पाणघोडा ८.दुधाचे दात १०.कडा ११.खजील १३.शिला १६.डावखुरा १७.ओणवा १८.वासा २०.वरात २१.पाणपोई २३.भलतेस-लते २५.यमद्वितीया २६.खोपट २९.रक्षा ३१.संकट ३३.हणमंत ३५.सुरा ३८.कच ४०.पोळी ४२.दरा ४३.भुई ४५.कथाकथन ४६.खलबतखाना ४७.नाल ४८.वाघीण४९.कष्ट ५१.गारवा ५२.डाव ५३अ.नवरात्र ५४.ऋचा ५५.कोपरा ५६.नगद ५७.रजनी ६०.पंथ




## थोडक्यात/ संक्षिप्त



### गंभीरच्या एका निर्णयाने टीम इंडिया बदलली?, सूर्यकुमार यादव

मुंबई–टी–२० वर्ल्डकप २०२६ चा थरार ७ फब्रुवारीपासून सुरू होत आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या या स्पर्धेत डिफेंडिंग चॅम्पियन टीम इंडिया पुन्हा एकदा जेतेपद राखण्याच्या मिशनवर उतरणार आहे. भारतीय संघ आपला पहिला साखळी सामना ७ फेब्रुवारी रोजी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर अमेरिकेविरुद्ध (ळएअ) खेळणार असून सामना सायंकाळी ७ वाजता सुरू होईल.
कर्णधार सूर्यकुमार यादव आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरची जोडी या स्पर्धेत भारताला जेतेपद मिळवून देण्यावर लक्ष केंद्रित करून आहे. गेल्या काही काळात टीम इंडियाचा फॉर्म सातत्यपूर्ण राहिला असून गंभीरच्या मार्गदर्शनाखाली ड्रेसिंग रूममधील वातावरणही सकारात्मक आणि हलकेफुलके असल्याचे बोलले जात आहे.
स्पर्धेआधी झालेल्या पत्रकार परिषदेत सूर्यकुमार यादवने संघाची तयारी आणि गंभीरच्या कोचिंगबाबत मोकळेपणाने भाष्य केले.

### काळा निळा पडलेला डोळा, नाकात बोळा, सुजलेला गाल, बेन स्टोक्सने शेअर केला धक्कादायक फोटा

**दिल्ली**–इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स आपल्या अफलातून खेळासाठी ओळखला जातो. चेंडू आणि फलंदाजी दोन्हीतून दमदार कामगिरी करत त्याने अनेकदा इंग्लंडला विजय मिळवून दिला आहे. मात्र, सध्या हा स्टार खेळाडू आपल्या खेळामुळे नाही, तर गंभीर दुखापतीमुळे चर्चेत आला आहे. बेन स्टोक्सच्या चेहऱ्यावर भयानक दुखापत झाली असून, त्याला ओळखणंही अवघड झालं आहे. या दुखापतीनंतर स्टोक्सने स्वत: इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर करत आपल्या तब्येतीबाबत माहिती दिली आहे.

**नेमकं काय घडलं?**

सराव सत्रादरम्यान वेगवान चेंडू थेट त्याच्या चेहऱ्यावर आदळला, ज्यामुळे त्याला गंभीर दुखापत झाली. या घटनेनंतर स्टोक्सने सोशल मीडियावर आपला एक धक्कादायक फोटो शेअर केला असून, त्या फोटोमध्ये त्याचा चेहरा ओळखणंही कठीण झालं आहे.
सोशल मीडियावर शेअर केली मभयानकफ फोटो
बेन स्टोक्सने इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या फोटोमध्ये त्याचा उजवा डोळा पूर्णपणे सुजलेला आणि काळा निळा पडलेला दिसत आहे. गाल आणि ओठांवर खोल ओरखड्यांच्या खुणा आहेत, तर नाकातून रक्तस्राव झाल्यामुळे बोळा लावलेली आहे. बेन स्टोक्सने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर करत लिहिलं, मफ्तुम्ही क्रिकेटच्या चेंडूची अवस्थाही पाहायला हवी.

### सूर्यकुमार यादव एकटाच नाही! टी-२० वर्ल्डकपमध्ये आणखी ३ भारतीय कर्णधार, एकाने तर पाकिस्तानलाच चारली धूळ

मुंबई–टी–२० वर्ल्डकप २०२६ ची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया पुन्हा जिंकण्यासाठी मैदानात उतरणार आहे. मात्र यावेळी फक्त भारताकडेच नव्हे, तर अनेक इतर संघांकडेही सर्वांचे लक्ष असणार आहे. या वर्षी टी–२० वर्ल्ड कपमध्ये एकूण २० संघ सहभागी होत असून, त्यात अनेक असोसिएट देशांचाही समावेश आहे. विशेष म्हणजे या स्पर्धेत सहभागी झालेल्या काही असोसिएट संघांचे नेतृत्व भारतीय वंशाच्या खेळाडूंकडे आहे. अशाच तीन कर्णधारांची ओळख आपण पुढे घेणार आहोत.
ओमान संघाचे नेतृत्व लुधियानात जन्मलेल्या जतिंदर सिंगकडे आहे. कोणतीही मोठी अकादमी किंवा औपचारिक प्रशिक्षण नसतानाही जतिंदरने आपल्या मेहनतीच्या जोरावर क्रिकेटमध्ये स्वत:ची ओळख निर्माण केली. सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली हे त्यांचे आदर्श असून, आज जतिंदर ओमानसाठी टी–२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. २०२५ मध्ये कर्णधारपदाची धुरा स्वीकारल्यानंतर त्याने ओमानला पहिल्यांदाच आशिया कपसाठी पात्र करून दाखवले.कॅनडाचा कर्णधार – दिलप्रीत सिंग बाजवा कॅनडाच्या संघाची सूत्रे पंजाबच्या गुरदासपूरमध्ये जन्मलेल्या दिलप्रीत सिंग बाजवाकडे आहेत.

# एरॉन जॉर्जच्या दमदार शतकामुळे भारत अंतिम फेरीत




**बुलावायो :** एरॉन जॉर्जचे दमदार शतक आणि वैभव सूर्यवंशीसह कर्णधार आयुष म्हात्रेच्या अर्धशतकाच्या जोरावर भारतीय संघाने १९ एकोणिस वर्षाखालील स्पर्धेच्या दुसर्या सेमीफायनलमध्ये अफगाणिस्ताला ७ बळींनी पराभूत करत फायनलमध्ये धडक मारली आहे. भारतीय संघ दहाव्यांदा फायनलमध्ये पोहचला आहे. यंदाच्या हंगामात जेतेपदाचा 'षटकार' मारण्यासाठी आता फायनलमध्ये युवा टीम इंडिया इंग्लंडच्या १९ संघाला संघाला भिडणार आहे. भारतीय संघाने विक्रमी धावसंख्येचा यशस्वी पाठलाग करताना ४२ व्या षटकातील पहिल्याच चेंडूवर विजय निश्चित केला.
पहिल्यांदा फलंदाजी करताना अफगाणिस्तानच्या संघाने फैजल खान ११० (९३) आणि उझैरुल्लाह नियाझाई १०१ (८६) या दोघांच्या शतकाच्या जोरावर निर्धारित ५० षटकात ४ बाद ३१० धावा केल्या होत्या. अफगाणिस्तानच्या संघाने दिलेल्या धावांचा ३११ धावांचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशी आणि एरॉन जॉर्ज जोडीनं संघाला दमदार सुरुवात करुन दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ९० धावांची भागीद-ारी रचली. वैभव सूर्यवंशी ३३ चेंडूत ६८ धावा करून परतल्यावर कर्णधार आयुष म्हात्रेनं दमदार अर्धशतक झळकावले.
कर्णधार आयुष म्हात्रे आणि एरॉन जॉर्ज या दोघांनी तिसर्या विकेटसाठी १०१ चेंडूत ११४ धावांची भागीदारी रचत अफगाणिस्तानी गोलंदाजांचे खांदे पाडले. आयुष म्हात्रेनं ५९ चेंडूत ५ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ६२ धावांची दमदार खेळी केली.
तो माघारी फिरल्यावरही एरॉन याने आपली खेळी कायम ठेवत शतक साजरे केले. विहान मल्होत्राच्या साथीनं ७९ चेंडूत ९६ धावांची आणखी एक दमदार भागीदारी रचताना एरॉन जॉर्जनं १५ चौकारआणि २ षटकारांच्या मदतीने ११५ धावांची खेळी केली. विहान मल्होत्रानं ४७ चेंडूत ३८ धावांची नाबाद खेळी करत वेदांद त्रिवेदीच्या साथीनं संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

## निर्णय बदलणे हे पाकिस्तान क्रिकेटमध्ये नवीन नाही : गावस्कर

नवी दिल्ली : पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने टी–२० विश्वचषक खेळण्यावर बहिष्कार टाकल्याबद्दल म्हटले होते आणि विश्वचषक खेळण्याचा निर्णय सरकार घेईल असेही सांगितले होते. आता पाकिस्तान सरकारने काही अटींसह संघाला स्पर्धेत सहभागी होण्याची परवानगी दिली आहे, ज्यामध्ये भारताविरूद्ध सामना खेळू नये ही मोठी अट आहे. याबाबत भारताचे लिटिल मास्टर सुनील गावस्कर यांनी पाकिस्तानचे निर्णय, त्यांचे खेळाडू अशा बर्याच मुद्द्यांवरून भाष्य केले आहे. 'पाकिस्तान क्रिकेटमध्ये अशा प्रकारचे निर्णय बदलले जाणे नवीन नाही. जसे पाकिस्तानचे खेळाडू निवृत्ती जाहीर करतात आणि काही दिवसांतच निवृत्ती घेतात हे पाकिस्तानच्या खेळाडूंनी दाखवून दिले आहे. या निर्णयाबाबतही तसेच होऊ शकते,' असे सांगत सुनील गावस्कर यांनी पाकिस्तानला सुनवले.



गावस्कर पुढे म्हणाले, पुढील २ ते ४ दिवसांत या प्रकरणावर जगभरातून खेळाडूंची व स्वत: पाकिस्तानी खेळाडूंच्याही प्रतिक्रिया येतील, तेव्हा हा निर्णय कदाचित बदलला जाऊ शकतो. यात नवीन काय आहे? पाकिस्तानचे क्रिकेटपटू निवृत्ती घेतात आणि चार दिवसांनी निवृत्तीतून माघार घेतात. आणि वर सांगतात आमचे इतके चाहते आहेत, त्यांनी सांगितले की, तुम्ही खेळले पाहिजे, हेच होऊ शकते; असे ते म्हणाले.संपूर्ण पाकिस्तानी चाहते जेव्हा म्हणतील तुम्ही हा काय निर्णय घेतला आहे. तेव्हा हा निर्णय बदलला जाईल.

**यामुळे स्पर्धेचे नुकसान : हरभजन सिंग**

याबाबत बोलताना माजी फिरकीपटू हरभजन सिंग म्हणाला, पाकिस्तान सरकारचे हे विधान फार काळ टिकणार नाही. याची सर्वत्र चर्चा होईल, प्रकरण तापेल आणि शेवटी, पाकिस्तान सामना खेळेल. पूर्वी असे म्हणायचे की, आम्हाला भारतात खेळण्यास यायचे नाही, आणि भारत पाकिस्तानात जाणार नाही, पण आता तुम्ही बांगलादेशाच्या मुद्द्यात उडी मारली आहे आणि तो मोठा बनवला. आता ते आयसीसीच्या स्पर्धेचे नुकसान करत आहे.

## कसोटी क्रिकेटमधील महत्त्वाचा नियम बदलला

मेलबर्न : क्रिकेटचे नियम बनवणारी संस्था मेलबर्न क्रिकेट क्लब (एमसीसी) ने २०२६ साठी नवीन कायदे नियम जाहीर केले आहेत. या कायद्याअंतर्गत क्रिकेटचे अनेक नियम बदलण्यात आले आहेत, ज्यामध्ये कसोटी क्रिकेटमध्ये मोठा बदल झाला आहे. एमसीसीने कसोटी क्रिकेटमध्ये एक नियम बदलला आहे, ज्यामुळे या फॉर्मॅटमध्ये अधिक उत्साह निर्माण होईल. क्रिकेटमधील बरेचसे नियम फलंदाजधार्जिणे असतात असे बोलले जाते. पण हा नवा नियम गोलंदाजी संघाला मदतनीस ठरू शकतो.
मेलबर्न क्रिकेट क्लबच्या नियम १२.५.२ नुसार, दिवसाच्या शेवटच्या षटकात विकेट पडल्यास कसोटी क्रिकेटमध्ये दिवसाचा खेळ थांबवला जाणार नाही. सामान्यतः दिवसाच्या शेवटच्या षटकात विकेट



पडल्यास, त्या वेळी दिवसाचा खेळ थांबवला जायचा. त्यानंतर फलंदाजी करणारा संघ दुसर्या दिवशी त्यांच्या रणनीतीनुसार फलंदाजाला मैदानात उतरवायचा.
पण आता एमसीसीच्या नियमांनुसार, शेवटच्या षटकात विकेट पडल्यास, सामना त्या दिवसाच्या शेवटच्या चेंडूपर्यंत चालू राहील. यामुळे क्षेत्ररक्षण करणार्या संघाला सामन्यावर नियंत्रण मिळविण्यात किंवा विरोधी संघावर दबाव आणण्यास मदत होईल. म्हणजेच मेलबर्न क्रिकेट क्लब (एमसीसी) च्या नवीन कायद्यानुसार, जर कसोटी सामन्यात दिवसाच्या शेवटच्या षटकात विकेट पडली, तर खेळ तिथेच थांबणार नाही, शेवटचा षटक पूर्ण होईपर्यंत खेळ सुरू राहील. एमसीसीच्या नवीन नियमांनुसार, महिला क्रिकेट आणि ज्युनियर क्रिकेटमध्ये (१३ वर्षांखालील) वापरल्या जाणार्या चेंडूमध्ये मोठा बदल होणार आहे. आतापर्यंत महिला क्रिकेटमध्ये चेंडूचे वजन १४० ते १५१ ग्रॅम दरम्यान होते आणि आकार २१–२२.५ सेमी होता, परंतु नवीन नियमांनुसार, आता चेंडूचे वजन १४० ग्रॅम ते १४९ ग्रॅम दरम्यान असेल आणि त्याचा आकार २१.५ ते २२ सेमी असेल. आतापर्यंत, ज्युनियर क्रिकेटमध्ये (१३ वर्षांखालील) वजन १३३–१४४ ग्रॅम होते आणि आकार २०.५–२२ सेमी होता. परंतु नियमांमध्ये बदल झाल्यानंतर, वजन १४०–१४४ ग्रॅम आणि आकार २०.५–२१ सेमी असेल.

## महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन प्रकरणी रोहित पवारांना धक्का



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांना सुप्रीम कोर्टात मोठा धक्का बसला आहे. इतकी बेकायदेशीर कामे करण्याची हिंमत कशी होते, असा सवाल सुप्रीम कोर्टाने रोहित पवारांना विचारल्याची माहिती आहे. रोहित पवारांनी पवार कुटुंबातील सदस्यांसह ४०० आजीवन सदस्य नोंदवले होते. त्याविरोधात टीम इंडियाचा माजी क्रिकेटर केदार जाधव यानं याचिका दाखल केली होती. त्यावरुन सुप्रीम कोर्टाने रोहित पवारांना सवाल विचारले. 'बेकायदेशीर कामे करता, केस मागे घेता की डिसमिस करु?' अशी विचारणा करत चउ च्या सदस्य नोंदणीवर कोर्टाने तीव्र आ–क्षेप घेतला.
रोहित पवारांनी पवार कुटुंबातील सदस्यांसह ४०० आजीवन सदस्य नोंदवले होते. बीसी–सीआय प्रकरणी निकाल दिल्यानंतर सदस्य नोंदणीला सुप्रीम कोर्टाची परवानगी लागते. आधी एमसीएच्या संविधानात तसा बदल करावा लागतो, याची माहिती असूनही बेकायदेशीर काम केल्याचा ठपका रोहित पवारांवर आहे. याच प्रकरणात सुप्रीम कोर्टाने रोहित पवारांना खडे सवाल विचारले. केदार जाधव यांच्या याचिकोनंतर हायकोर्टाने अंतरिम स्थगिती दिली होती. त्याविरोधात रोहित पवार सुप्रीम कोर्टात गेले होते. यावर सुप्रीम कोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली. इतकी बेकायदेशीर कामे करण्याची हिंमत कशी होते, असा सवाल सुप्रीम कोर्टाने केला. सुप्रीम कोर्टाच्या इर्शाय़ानंतर अखेर रोहित पवारांनी याचिका मागे घेतली.रोहित पवारांनी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनची सत्ता टिकवण्यासाठी मनमानी पद्धतीने संघटनेची सदस्यसंख्या वाढवल्याचा आर–ोप भारताचा माजी क्रिकेटपटू केदार जाधवने केला होता.केदार जाधव हा महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचा सदस्य असून भारतीय जनता पक्षाचा पदाधिकारी देखील आहे. रोहित पवारांनी आपल्या बाजूने मतदान व्हावं यासाठी एम सी ए ची सदस्यसंख्या १५४ वरुन वाढवून ५७१ नेली. त्यासाठी रोहित पवारांनी सदस्य करून घेतलेल्यांमधे त्यांची पत्नी कुंती , सासरे सतिश मगर यांच्यासह सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती सदानंद सुळे यांचाही सामावेश आहे. त्याचबरोबर रोहित पवारांच्या कंपन्यांमध्ये काम करणारे कर्मचारी देखील सदस्य करून घेण्यात आ–लेत.
त्याचबरोबर अनेक राजकीय नेते आणि शैक्षणिक संस्थांना देखील ऐन निवडणुकीच्या तोंडावर सदस्य करून घेण्यात आलेय असा आरोप केदार जाधव यांनी केला होता. रोहित पवारांच्या या कारभाराच्या विरोधात केदार जाधवसह लातुर जिल्हा क्रिकेट असोसिएशन , महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य अनंत माटे , पुण्यातील एस पी महाविद्यालय यांनी या निर्णयाला आव्हान देत स्वतंत्रपणे या निवडणुकीला स्थगिती देण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. त्यावरती निर्णय देताना न्यायालयाने ६ जानेवारीला होणारी निवडणूक स्थगित करण्याचा निर्णय दिलाय. या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ फेब्रुवारीला होणार असून तोपर्यंत एम सी एच्या निवडणूक प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली होती. यानंतर रोहित

## स्मृती मनधानाच्या आरसीबीची विजयी घोडदौड सुरूच; दुसऱ्यांदा पटकावलं थझङ चं जेतेपद

**वडोदरा:** चार आठवड्यांच्या लढतीनंतर, महिला प्रीमियर लीग २०२६ चा गुरुवार ५ फेब्रुवारी रोजी वडोदरा येथील बीसीए स्टेडियमवर अंतिम सामना झाला. या सामना दिल्ली आणि बेंगळुरू या संघांमध्ये झाला असून, बंगळुरूच्या संघाने सामना जिंकून दुसऱ्यांदा थझङ चं जेतेपद आपल्या ना–वावर कोरलं आहे.अंतिम सामन्यात जेमिमा रॉड्रिग्जच्या दिल्ली कॅपिटल्सचा पराभव करून स्मृती मानधनाच्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने हा सामना ६ विकेट्सने जिंकला आहे.स्मृती मनधानाची मॅच विनिंग खेळी:पहिल्या डावात फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्स संघाने अंतिम सामन्यातील सर्वोच्च धावसंख्या उभारली. कर्णधार जेमिमा रॉड्रिग्जच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर दिल्लीने २०३ धावांचा डोंगर उभारला. दिल्लीने दिलेल्या लक्षाचे यशस्वी पाठलाग करत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ६ विकेट्सने बाजी मारली. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने महिला प्रीमियर लीगची दुसऱ्यांदा जेतेपदाची ट्रॉफी उंचावली आहे. आरसीबीकडून कर्णधार स्मृती मानधना हिनं ८७ धावांची मॅच विनिंग खेळी केली. जॉर्जिया व्हॉल हिनं ७९ धावांची खेळी केली. या दोघींच्या फलंदाजीच्या जोरावर आरसीबीनं विजेतेपद मिळवलं
जेमिमा रॉड्रिग्जच्या दिल्ली कॅपिटल्सनं सलग चारवेळा अंतिम फेरीत धडक दिली. मात्र, त्यांच्या संघाचं विजेतेपदाचं स्वप्न यंदा देखील पूर्ण होऊ शकलं नाही. डब्ल्यूपीएलच्या चार हंगामात दोनवेळा मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं विजेतेपद पटकावलं आहे.

# बंगळुरुविरुद्ध दिल्ली यांच्यात रंगणार अंतिम सामना

मुंबई : जेमिमा रॉड्रिग्सच्या दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने गुजरात जाएंटसविरुद्धची एलिमिनेटरची लढाई जिंकत फायनलमध्ये प्रवेश केला आहे. पहिल्यांदा फलंदाजी करताना गुजरातच्या संघाने बेथ मूनीचं दमदार अर्धशतक आणि अखेरच्या षटकात जॉर्जिया वेरहॅम हिने केलेल्या उपयुक्त खेळीच्या जोरावर निर्धारित २० षटकात ७ विकेट्सच्या मोबदल्यात १६८ धावा करत दिल्ली कॅपिटल्ससमोर १६९ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना जेमीच्या दिल्लीनं दिल्लीच्या संघाच्या नेतृत्वात बदल झाला, पण सलग च७ विकेट्स आणि २६ चेंडू राखून सामना जिंकत फायनलचं तिकीट मिळवलं. थझङ च्या सलग चौथ्या हंगामात दिल्ली कॅपिटल्सचा संघ फायनलमध्ये खेळताना दिसणार आहे. याआधी मेग




लेनिंगच्या नेतृत्वाखाली दिल्ली कॅपिटल्सच्या संघाला पहिल्या तीन हंगामात फायनल गाठल्यावर पराभवाचा सामना करावा लागला होता.
जेमीच्या नेृत्वाखालील संघ स्मृतीच्या ठउइ ला पराभूत करत ही पराभवाची मालिका खंडीत करत पहिली थझङ ट्रॉफी उंचावणार का? ते पाहण्याजोगे असेल.पहिल्यांदा फलंदाजी करताना गुजरात जाएंट्सची सुरुवात खूप खराब झाली. अवघ्या ५९ धावांवर संघाने पहिल्या चार विकेट्स गमावल्या होत्या. संघ अडचणीत असताना सलामीवीर बेथ मूनी हिने शेवटपर्यंत मैदानात थांबून ५१ चेंडूत ६२ धावांची नाबाद खेळी केली. याशिवाय जॉर्जियानं २५ चेंडूत केलेल्या ३५ धावांच्या उपयुक्त खेळीच्या जोरावर गुजरातच्या संघाने एलिमिनेटरच्या लढतीत १६८ धावांपर्यंत मजल मारली. दिल्लीकडून शिनेल हेन्री (उहळपशश्रश्रश कशपी) हिने सर्वाधिक ३ तर नंदिनी शर्मानं २ विकेट्स घेतल्या. मिनू मनी हिनेही एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सच्या सलामी बॅटर्सनी संघाला दमदार सुरुवात करुन दिली. लीझेल ली ४३ (२४) आणि शेफाली वर्मा ३१ (२१) यांनी पहिल्या विकेटसाठी ४३ चेंडूत ८९ धावांची भागीदार करत सामन्यावर मजबूत पकड मिळवली. दोघीही अर्धशतका आधीच पॅव्हेलियनमध्ये परतल्या



# मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय महिनाभरात कार्यान्वित होणार!

## मुरुडकरांनी विकासाच्या पाठीशी राहावे आ. रमेशआप्पा कराड यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून मुरुडच्या विकासाला गती मिळाली. उपजिल्हा रुग्णालयासह मुरुडच्या पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर असून सर्व सोयींनी युक्त बसस्थानक उभारण्यात आले. ग्रामपंचायतीला नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासन दरबारी असून वर्षभरात मंजुरी मिळवून घेणार असल्याची ग्वाही देऊन येत्या महिनाभरात मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित होणार असून ही तालुका निर्मितीची पहिली पायरी आहे तेव्हा मुरुडकरांनी विकासाच्या पाठीशी राहून भाजपाच्या उमेदवारांना बहुमताने विजयी करावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

भारतीय जनता पार्टीचे मुरुड जिल्हा परिषद गटातील उमेदवार सौ. रंजनाताई बळीराम हिंगले, मुरुड - १ पंस गणातील उमेदवार उद्धव सूर्यभान चव्हाण आणि मुरुड - २ पंस गणातील उमेदवार सौ. मनिषा सचिन देवकर यांच्या प्रचारार्थ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी सायंकाळी मुरुड येथे भव्य प्रचार जाहीर सभा झाली. या सभेस माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, मुरुडच्या सरपंच अमृताताई अमर नाडे, उपसरपंच वैभव सापसोड, भाजपाचे महेश कणसे, विजय काळे, लताताई भोसले, उषाताई शिंदे, रवी माकुडे, लहू सव्वाशे, नागराज बचाटे, संतोष काळे, आबू देवकर, वैजनाथ हराळे, शहानुर पठाण, सुरज सूर्यवंशी, शाम करपे, रमाकांत गायकवाड, विष्णू महानवर, शाहीन सय्यद, अशोक चव्हाण, योगेश पुदाले, दत्ता पुदाले यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. मुरुड येथील भाजपाच्या या प्रचार जाहीर सभेस प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता यात महिलांची संख्या लक्षणीय दिसून आली. आ. कराड यांचे मुरुड नगरीत आगमन होताच फटाक्याची आतिषबाजी करून ढोल ताशाच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले.





या जाहीर सभेत बोलताना भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेली वीस - पंचवीस वर्ष ज्यांनी मुरुडवर राज्य केले त्यांनी मुरुड साठी काय केले असा प्रश्न उपस्थित करून मुरुड हे बाजारपेठेचे मोठे गाव असून प्रत्येक वेळी विकासाला आडवे येऊन मुरुडला विकासापासून वंचित ठेवण्याचे पाप केले. प्रत्येक वेळी आपल्या सोयीनुसार कधी घड्याळ, कधी तुतारी तर जमल तेव्हा हात. नेमके हे आहेत तरी कुठे असा प्रश्न उपस्थित करून स्वतःसाठी सातत्याने राजकीय भूमिका बदलणाऱ्यांना मतदारांनी जागा दाखवावी असे बोलून दाखवले.

या मतदार संघावर पन्नास वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसवाल्यांनी सातत्याने मुरुडकडे दुर्लक्ष केले असून विकासाची कोणतीही योजना मंजूर केली नाही उलट आमदार होऊन मला एक वर्ष झाले भाजपा शासनाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून विकास आणि विकास निधी काय असतो हे दाखवून देण्याचे काम केले असल्याचे सांगून पुढे बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, केंद्रातील मोदीजींच्या आणि राज्यातील देवेंद्रजी फडणवीस यांच्या शासनाच्या माध्यमातून सिमेंट रस्ते, आरोग्याच्या सुविधा, पाणी पुरवठ्याच्या योजना यासह विविध विकास कामातून विकासाची मोठी उंची गाठली असून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला शेतकरी पेन्शन, शेतीला मोफत वीज, लाडकी बहीण, महिलांना प्रवासात सवलत, मागेल त्याला शेततळे, गाय गोठे, मोफत अन्नधान्य, घरकुल, सौर ऊर्जा पंप यासह विविध योजनेच्या माध्यमातून दिलासा देण्याचे काम झाले. आपल्या गावाच्या आणि परिसराच्या विकासासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही तेंव्हा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतील भाजपाच्या तिन्ही उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आव्हान केले.

या सभेत माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे बोलताना म्हणाले की, विकासाची दृष्टी असलेल्या भाजपाकडे देशात आणि राज्यात नेतृत्व असून त्यांच्या माध्यमातून वेगाने विकास कामे होताना दिसत आहेत. प्रत्येक घटकांना न्याय दिला जात आहे. लातूर ग्रामीण मतदार संघात विविध विकास कामासाठी कोट्यावधी रुपये खेचून आणण्याचे काम रमेशआप्पा कराड यांनी केले असून जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी २४ तास उपलब्ध असणारे रमेशआप्पा एकमेव आमदार आहेत. ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी भाजपाच्या सर्व उमेदवारांना आशीर्वाद देऊन बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले. या सभेत सरपंच अमृता नाडे, उपसरपंच वैभव सापसोड, महेश कणसे, लहू सव्वाशे यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून मुरुड नगरीत झालेल्या विविध विकास कामाची माहिती देऊन मुरुडची जनता विकासासोबत आहे त्यामुळे मुरुड येथील भाजपाच्या तिन्ही जागा प्रचंड बहुमताने विजयी व्हाव्यात यासाठी आम्ही सर्वजण जिद्दीने जोमाने काम करीत असल्याचे बोलून दाखविले सभेचे सूत्रसंचालन वैजनाथ हराळे यांनी केले. या सभेला मुरुड नगरीतील मतदार बंधू भगिनीचा प्रचंड मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## लातुरात दि. ११ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत नवनिर्माण व्याख्यानमालेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू. गोळवलकर गुरुजी यांच्या जन्मदिनानिमित्त दि. ११ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत लातुरात प्रतिवर्षाप्रमाणे नवनिर्माण प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी दिली.

सन २०२५ -२६ या वर्षात वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापनदिन, रा. स्व. संघाच्या स्थापनेचे शताब्दी वर्ष व पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी समाजोन्नतीसाठी मांडलेले एकात्म मानव दर्शन या सिद्धांताचे हीरक महोत्सवी वर्ष अशा विचारांच्या त्रिवेणी संगमाचा योग लक्षात घेऊन सदर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. दि. ११ फेब्रुवारी रोजी नाशिकच्या स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक प्रकाश पाठक यांचे एकात्म मानव दर्शन या विषयावर , दि. १२ फेब्रुवारी रोजी प्राचार्य अनंतराव पांडे यांचे पंच परिवर्तनातून सामर्थ्यशाली समाज व वैभवशाली राष्ट्र निर्मिती , तर दि. १३ फेब्रुवारी रोजी विद्यावाचस्पती गुरुदेव शंकरराव अभ्यंकर यांचे वंदे मातरम - राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापनदिन या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अनुक्रमे भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुशिलदादा बाजपायी, योगाचार्य दिलीपराव भातलवंडे, माजी कुलगुरू कर्नल डॉ. कारभारी काळे यांची उपस्थिती राहणार आहे.

ही व्याख्यानमाला दररोज सायंकाळी सहा वाजता दयानंद सभागृह, लातूर याठिकाणी होणार आहे. या व्याख्यानमालेचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, उपाध्यक्ष महेंद्र जोशी, कार्यवाह अशोक शिवणे, कोषाध्यक्ष उमेश कुलकर्णी यांसह सुधीर धुत्तेकर, शैलेश कुलकर्णी, धनंजय पटवारी, संजय गुरव, सौ. प्राजक्ता देशमुख, एड. सौ. प्रणाली रायचूरकर, व्यंकटेश कुलकर्णी, चंद्रकांत कुलकर्णी, उमेश सेलूकर, किशोर कुलकर्णी, यांनी केले आहे.

## संशोधन प्रकल्प व ओजेटी प्रकल्प लेखनावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद एज्युकेशन सोसायटी संचलित दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स येथील पीजी रिसर्च कमिटीच्या वतीने संशोधन प्रकल्प व ओजेटी प्रकल्प लेखनावर या विषयावर एकदिवसीय सत्राचे आयोजन करण्यात आले. सदर सत्र दि. ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी सेमिनार हॉल येथे संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर हे होते. तज्ज्ञ वक्ते म्हणून डॉ. सचिन प्रयाग, प्रभारी प्राचार्य, ब्रिलियंट कॉमर्स कॉलेज, लातूर यांनी संशोधन प्रकल्प लेखनातील विविध टप्पे, विषय निवड, उद्दिष्टे, गृहितके, साहित्य समीक्षा, संशोधन पद्धती, माहिती संकलन व विश्लेषण तसेच ओजेटी प्रकल्प अहवाल तयार करताना आवश्यक बाबींचे सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. जी. आर. लहाने तसेच आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण हे उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना व परिचय डॉ. बी. जी.कळंबे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुहाना शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. रूपा गिल्डा यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. या सत्रामुळे विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प व ओजेटी प्रकल्प लेखनाची योग्य दिशा मिळाली असून प्रकल्प अहवाल अधिक प्रभावीपणे तयार करण्यास मदत होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. सदर सत्राच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विशाल वर्मा, डॉ. अनुजा कांबळे, कु. साक्षी पाटील व कु. ऐश्वर्या कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच कार्यक्रमात त्यांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

# भ्रष्टाचाराचा कळस गाठणाऱ्या भाजपला मतदारांनी पराभूत करून जमीनीवर आणावे

## लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांचे मतदारांना आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण मतदारसंघात विद्यमान भाजप आमदारांकडून कोणतेही ठोस विकासकाम झाले नसून जनतेच्या भावनांशी खेळण्याचे काम भाजपकडून सातत्याने सुरू असल्याचे लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.रेणापुर तालुक्यातील पोहरेगाव येथे जिल्हा परिषद गटाचे उमेदवार मनिषा गंगासिंह कदम, पोहरेगाव पंचायत समिती डॉ तात्याराव सखाराम वाघमारे, निवाडा पंचायत समिती गण बालाजी पंडीत गोटके यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.





ते म्हणाले की, भाजपच्या चुकीच्या धोरणांमुळे सामान्य जनता मोठ्या प्रमाणात भरडली जात आहे. ग्रामीण भागात मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी नागरिकांकडून थेट पैसे घेतले जात असल्याचे उघडपणे सांगितले जात आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. सत्तेचा गर्व भाजपच्या नेत्यांच्या डोक्यात गेला असून हा गर्व जिल्हा परिषद निवडणुकीत मतदार भाजप उमेदवारांना पराभूत करून उतरवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लातूर ग्रामीण मतदारसंघातील भाजप आमदारांनी अडचणीच्या काळात मतदारसंघाला वाऱ्यावर सोडले असल्याची टीकाही त्यांनी केली. लातूर ग्रामीण मतदारसंघ हा एकोप्याने चालणारा व विकास जोपासणारा मतदारसंघ असून या मतदारसंघाची प्रतिष्ठा जपण्याचे काम सर्वांनी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषद निवडणुकीत भाजप बॅकफूटवर गेली असून सर्वत्र काँग्रेस पक्षाची सकारात्मक हवा दिसून येत असल्याचा दावा त्यांनी केला. काँग्रेस पक्षाच्या विचारधारेतूनच लातूर जिल्ह्याचा विकास झाला आहे. मांजरा परिवारातील साखर कारखाने व लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागासाठी अनेक योजना यशस्वीपणे राबवण्यात आल्या असून त्यातून शेतकरी व सर्वसामान्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडून आले असल्याचे त्यांनी नमूद केले.

लोकांच्या प्रश्नांची जाण असणारे, सक्षम व विकासाभिमुख उमेदवार काँग्रेस पक्षाकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे येत्या ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानात सर्व काँग्रेस उमेदवारांना हाताच्या चिन्हासमोरील बटन दाबून ग्रामीण भागाची सेवा करण्याची संधी द्यावी, असे आवाहन धिरज विलासराव देशमुख यांनी मतदारांना केले.

यावेळी अर्चना कमलाकर सोळंके यांनी पोहरेगाव गटातून आपला उमेदवारी अर्ज मागे घेवून काँग्रेस पक्षाला पाठिंबा दिल्या बद्दल त्यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.

सदरील सभेस काँग्रेस पक्षाचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत वंजारवाडीतील शेकडो भाजप कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**रेणपूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यातील वंजारवाडी येथील भाजप पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा काँग्रेस नेते धिरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे रेणापूर तालुक्यात काँग्रेस पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे चित्र आहे.



काँग्रेसमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये सुनिल मुंडे, व्यंकट मुंडे, भरत घुगे, ऋषिकेष मुंडे, प्रकाश फड, दत्ता मुंडे, श्रीकृष्ण घुगे, सतीश घुगे, नितीन मुंडे, बालाजी मुंडे, उमेश मुंडे, ओमकार मुंडे, हणमंत मुंडे, मनोज घुगे, लक्ष्मण घुगे, नामदेव मुंडे, बाळासाहेब मुंडे, संपत मुंडे, श्रीमंत मुंडे, प्रशांत मुंडे, पवन फड, नरसिंग मुंडे, भक्तराम घुगे, केशव मुंडे, गोविंद घुगे, गणेश घुगे, परमेश्वर मुंडे, भागवत मुंडे, यशवंत मुंडे, ज्ञानोबा मुंडे, अमोल मुंडे, शत्रुघ्न घुगे, माऊली घुगे, अतुल मुंडे, रामभाऊ घुगे, लक्ष्मण मस्के, नवनाथ मस्के यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा समावेश आहे. हा पक्षप्रवेश पोहरेगाव येथे आयोजित सभेत पार पडला. यावेळी धिरज विलासराव देशमुख यांनी सर्व नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत करत पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवून सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी एकत्र काम करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या मोठ्या पक्षप्रवेशामुळे रेणापूर तालुक्यात आगामी काळात काँग्रेस पक्ष अधिक सक्षमपणे कार्य करेल, असा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाच्या नेत्या डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचा प्रचाराचा झंझावात



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या प्रचार मोहिमेला वेग आला असून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वाखाली विविध ठिकाणी सभा व कॉर्नर बैठका संपन्न झाल्या.

पाकर सांगवी, हरंगुळ, चापोली, वडवळ नागनाथ, नळगीर, सोमनाथपूर, नळेगाव, आर्वी या जिल्हा परिषद गटामध्ये विविध गावांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित कार्यक्रमांना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी उपस्थित राहून जनतेशी थेट संवाद साधला.

या संवादादरम्यान ग्रामविकास, रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण तसेच युवकांना रोजगाराच्या संधी या प्रमुख मुद्द्यांवर भर देण्यात आला.

''सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास'' या मंत्रावर विश्वास ठेवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर शिक्कामोर्तब करत सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी विजयी करावे, असे आवाहन डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मतदार बांधवांना केले.

## अभिजात फिल्म सोसायटीतर्फे रविवारी गांधी टॉक्स.. या सिनेमाचा विशेष शो

### दिग्दर्शक किशोर बेळेकर राहणार उपस्थित

**लातूर/प्रतिनिधी :** येथील अभिजीत फिल्म सोसायटी तर्फे गांधी टॉक्स या मूक सिनेमाचा विशेष शो दि. ८ फेब्रुवारी, रविवार रोजी दुपारी चार वाजता पिव्हीआर टॉकीज येथे आयोजित करण्यात आला आहे. या सिनेमाच्या निमित्ताने दिग्दर्शक किशोर बेळेकर उपस्थित राहणार असून चित्रपटानंतर ते प्रेक्षकांशी संवाद देखील साधणार आहेत.




गांधी विचारांना जगण्याच्या चलनात आणण्याचा एक वेगळा प्रयत्न असलेला गांधी टॉक्स ... संवादविरहित चित्रपट आहे. किशोर बेळेकर या मराठी माणसाने तब्बल २४ वर्षे धडपड करून बनवलेला हा ब्लॅक कॉमेडी कला प्रकारातून उलगडणारा चित्रपट आहे. विजय सेतुपती, अरविंद स्वामी,अदिती राव हैदरी, सिद्धार्थ जाधव अशा प्रथितयश कलाकारांच्या यात प्रमुख भूमिका आहेत.

ए. आर. रहमान यांच्या आशयपोषक संगीताने आणि पार्श्वसंगीताने हा सजलेला चित्रपट सर्व लातूरकरांनी पाहावा असे आवाहन अभिजात फिल्म सोसायटीतर्फे करण्यात आले आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक पार्श्वभूमीवर लातूर पोलिसांची अभूतपूर्व तयारी

## शांततापूर्ण निर्भय व पारदर्शक निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्हाभर कडक बंदोबस्त



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आगामी निवडणुका कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत, शांततापूर्ण व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी लातूर पोलीस दलाने व्यापक, काटेकोर व बहुआयामी स्वरूपाची तयारी केली आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच मतदारांना निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावता यावा, या उद्देशाने जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संवेदनशील व अतिसंवेदनशील भागांची ओळख करून त्या-त्या ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त, सतत गस्त, निगराणी व तत्काळ प्रतिसाद व्यवस्था उभारण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कोणतीही परिस्थिती उद्भवल्यास त्वरित नियंत्रण मिळवण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी लातूर जिल्ह्यात खालीलप्रमाणे निवडणूक रचना निश्चित करण्यात आली आहे

**एकूण पंचायत समिती गण ११८**

- एकूण मतदान केंद्रांच्या इमारती : १०५६
- एकूण मतदान बूथ : १७५३
- एकूण सेक्टर / गण : ११८

असे असून प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून, मतदान प्रक्रियेच्या सुरुवातीपासून संपूर्ण वेळेत कडक सुरक्षा व्यवस्था राखण्यात येणार आहे.

निवडणूक बंदोबस्ताचे निवडणूक पर्यवेक्षण अधिकारी म्हणून श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या थेट मार्गदर्शनाखाली सर्व अधिकारी व कर्मचारी कार्यरत राहणार असून, बंदोबस्ताची प्रभावी अंमलबजावणी केली गेली आहे.

निवडणूक कालावधीत जिल्ह्यात खालीलप्रमाणे मोठ्या प्रमाणात पोलीस मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे यामध्ये

**उपविभागीय पोलीस अधिकारी : ०८**

- पोलीस निरीक्षक : १८
- सहाय्यक पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक : १२५
- पोलीस अंमलदार : १९४५
- होमगार्ड : ३०८०
- SRPF : ०२ कंपन्या

हे सर्व मनुष्यबळ मतदान केंद्रे, संवेदनशील भाग, मतपेटी वाहतूक मार्ग तसेच मतमोजणी केंद्रांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले आहे.

**बाहेरून अतिरिक्त बंदोबस्त.**

निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणत्याही संभाव्य तणावपूर्ण परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्ह्याबाहेरूनही अतिरिक्त पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला आहे यामध्ये

- वर्धा, वाशिम व अमरावती येथून १९४३ होमगार्ड.
- नांदेड, मुंबई, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, हिंगोली व भंडारा येथून ५३ पोलीस अधिकारी
- वर्धा, चंद्रपूर, नांदेड व हिंगोली येथून ६३० पोलीस अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आली असून त्याशिवाय प्रत्येक पंचायत समिती गण करिता एस आर पी एफ चे ०२ सेक्शन आणि लातूर ग्रामीण करिता ०१ एसआरपीएफ लाटून तैनात करण्यात आले आहे

याशिवाय निवडणूक काळात कोणतीही अनुचित घटना, वाद, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न किंवा तणाव निर्माण झाल्यास त्वरित कारवाई करण्यासाठी सेक्टर पेट्रोलिंग नेमण्यात आली असून एकूण ०४ स्ट्राइकिंग पथके पोलीस नियंत्रण कक्ष येथे सतत तैनात ठेवण्यात आली आहेत. अनुचित किंवा कायदा व सुव्यवस्था ची परिस्थिती उद्भवताच संबंधित स्ट्राइकिंग फोर्स त्याठिकाणी तात्काळ पोहोचून नियंत्रण मिळवण्याचे आदेश या पथकांना देण्यात आले आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक अनुषंगाने रूट मार्च घेण्यात आला असून नागरिकांमध्ये निवडणूक अनुषंगाने विश्वासार्हतेचे वातावरण निर्माण करण्यात आले आहे

**नागरिकांना व मतदारांना आवाहन**

लातूर पोलीस दलामार्फत सर्व नागरिक व मतदारांना शांतता राखण्याचे, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे तसेच कोणताही कायदा भंग करणारा प्रकार आढळल्यास तात्काळ पोलीस प्रशासनास कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पोलीस प्रशासन सदैव सज्ज असून, कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### लातूर जिल्ह्यात शनिवारी भरणारे आठवडी बाजार राहणार बंद

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवार, ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होत आहे. या निवडणुकीमध्ये मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, तसेच मतदान शांततेत पार पडावे, यासाठी लातूर जिल्ह्यात शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले आहेत.

### प्रभात किरणे

अमर्याद हे विश्व
आनंती आनंत
जो येतो भूवरी
त्याचा होतो अंत
का कशाला भीती
असावी मनात
जगावे जगवावे सुख
नसते धनात
– इंजि. नागनाथ
कलवले, लातूर

### आपले मत...

सवय असे काहींना
रेटायचे आपले मत
हट्ट असतो सर्वांनी
व्हावे संपूर्ण सहमत

आगंतुक अनाठायी
बसलेनाक खुपसत
रिकामटेकडे नाकर्ते
असे भरपूर फुरसत

कैकवेळ सर्वांसमोर
असे झाली फसगत
सर्वाधिकार आपणां
करू पाहते हस्तगत

सुखानंदानेसजवली
बसली जाहीर पंगत
आमची भिन्न बैठक
हो विक्षिप्त विसंगत

एकसूर मैफिलीतला
भैरवी आलेली रंगत
एकसुरी वागतोयं मी
जमलेलेगीत दुभंगत

लावून तोरणेपताका
स्वतास्वताचे स्वागत
कुणी नसू दे बोलवत
हजर रहायचे बेमुर्वत

स्वकेंद्रित स्वता मध्ये
चाललोसहज हरवत
टेंभा आपलाउजळत
बसतो मात्र फिरवत

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक शिक्षणाचे दरवाजे उघडणार !

## – आदिवासी विकास विभागाकडून पात्र ४० तरुण-तरुणींना
## – परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळणार

**लातूर/प्रतिनिधी :** अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुलां-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी, त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविली जात आहे. या योजनेतंर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहे.

आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक, आकस्मिक, इतर खर्च, विमान प्रवास खर्च,व्हिसा शुलक आणि आरोग्य विमा यांचा समावेश असणार आहे. शैक्षणिक, आकस्मिक, इतर खर्च युएएस व इतर देशांसाठी (युके वगळून) १ हजार ५०० युएस डॉलर तर युकेसाठी १ हजार १०० जीबीपी इतका दरवर्षी देण्यात येईल.

लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न ८ लाख रुपये तसेच विद्यापीठांची क्युस रँकिग मर्यादा २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहीत निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची उत्पन्न मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत शिथिल केली जाईल. तर क्युस वर्ल्ड रँकिग मर्यादा २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल. परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक टीओईएफएल किंवा आयईएलटीएस यासारख्या प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे. शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी विहीत नमुन्यातील आवेदन https://fs.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर भरणे अनिवार्य आहे. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले जातील. निवड समितीद्वारे निकष पूर्ण करणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. योजनेच्या अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन आदिवासी विकास विभागाने केले.

योजनेचे निकष

विद्यार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील आणि महाराष्ट्राचा रहिवासी असावा. पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे तर पीएचडी अभ्यासक्रमासाठी ४० वर्षे वयोमर्यादा निश्चित करण्यात आली . कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत असावे. आवश्यक टीओईएफएल, आयईएलटीएस किंवा समकक्ष प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणे आवकश्य आहे.

राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पीएसडी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या परदेशातील उच्च शिक्षण घेण्याच्या इच्छूक आणि पात्र विद्यार्थ्यांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन आदिवासी विकास विभागचे आयुक्त लीना बनसोड यांनी केले आहे.

### इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२३-२४ पासून लातूर जिल्ह्यात दोन शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. यात मुलांसाठी १०० आणि मुलींसाठी १०० अशा एकूण २०० विद्यार्थी क्षमतेच्या वसतिगृहांचा समावेश आहे. या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि शैक्षणिक साहित्य मोफत पुरवले जाते. या वसतिगृह प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असून पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. विद्यार्थी त्या शहराचा स्थानिक रहिवाशी नसावा, जिथे शैक्षणिक संस्था आहे. विद्यार्थ्याने बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेतलेले असावे आणि बारावीत किमान ६० टक्के गुण असावेत. सन २०२५-२६ साठी रिक्त जागांवरील वसतिगृह प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी १८ सप्टेंबर २०२५ पर्यंत https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत. मुलींच्या वसतिगृहाबाबत माहितीसाठी गृहपाल श्रीमती वृषाली बडे (मो. ९०२८२६११८३) आणि मुलांच्या वसतिगृहाबाबत माहितीसाठी गृहपाल तिरुके सुरज (मो. ८३२९४४७४१०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

# इयत्ता दहावी, बारावी परीक्षा केंद्रांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/प्रतिनिधी :** उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता बारावी) १० फेब्रुवारी, २०२६ ते ११ मार्च, २०२६ या कालावधीत १५२ परीक्षा केंद्रावर व माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी) २० फेब्रुवारी, २०२६ ते दि. १८ मार्च, २०२६ या कालावधीत २५२ परीक्षा केंद्रावर पार पाडली जाणार आहे. या सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये या परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी परिक्षार्थी एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करण्यात येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यत बंद राहतील.

परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल. कोणत्याही व्यक्तीकडून परीक्षा सुरळीतपणे शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करण्यात येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही व्यक्तीस अथवा वाहनास प्रवेश मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी,कर्मचारी यांच्याबाबत त्यांच्या परीक्षासंबंधी कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत. १० फेब्रुवारी,२०२६ ते १८ मार्च,२०२६ या कालावधीमध्ये सकाळी ९ ते दुपारी ६ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**भारत जगासोबत स्पर्धा करण्यासाठी सज्ज - पंतप्रधान**

### चिमटा दयाचा



छापे पडत असतात !
गुन्हे नोंद होत असतात !!
मटका, जुगार,
अवैध दारू कायम
बंद होत नसतात !!

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीमुळे मद्यविक्री राहणार बंद

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणूक २०२६ कार्यक्रमानुसार ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान व ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ (सी) अंतर्गत तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार मतदानापूर्वीचा संपूर्ण दिवस म्हणजे ६ फेब्रुवारी २०२६, मतदानाचा संपूर्ण दिवस म्हणजे ७ फेब्रुवारी २०२६ रोजी महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत क्षेत्र वगळून संपूर्ण लातूर जिल्हा अबकारी अनुज्ञप्त्या (मद्य दुकाने) बंद राहतील.

याशिवाय, मतमोजणीच्या दिवशी म्हणजे ९ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे, लातूर जिल्ह्यातील मतमोजणीचे ठिकाणी मद्यविक्री अनुज्ञप्त्याही बंद राहतील. एफएल-२, एफएलबीआर-२, एफएल-३, एफएल-४, एफएलबीआर-११ तसेच ताडी अनुज्ञप्ती इत्यादी सर्व प्रकारच्या मद्यविक्री अनुज्ञप्त्या या कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी महाराष्ट्र मद्य निषेध कायदा १९४९ व महाराष्ट्र विदेशी मद्य नियम, १९६९ मधील तरतुदीनुसार निर्गमित केले आहेत. याबाबतची कार्यवाही संबंधित यंत्रणांना निर्देशित करण्यात आली आहे.

रोज वाचा ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत कामे**
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी), मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने त्यांच्यासाठी, प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा क्रमांक: SUR/TD/T/2025/26R, कामाचे नाव:** टिकेकरवाडी येथे प्रस्तावित कोचिंग मेंटेनन्स डेपोच्या (टप्पा-१) संदर्भात विद्युत टीआरडी कामाचा भाग (पुन्हा निमंत्रण) **अंदाजित किंमत:** ५,६२,९६,४६५.२०. **बोली सुरक्षा:** ४,३१,५००/-, **कामाचा कालावधी:** १२ महिने. **प्रस्तावाची वैधता:** ६० दिवस. **वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** ०२.०३.२०२६ रोजी १५.०० वाजता. EXP-06
तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**इतर कामे**
विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा सूचना क्र. 01-2026-SrDENC, कामाचे नाव:** (१) लातूर स्टेशनवरील प्लॅटफॉर्म-०२ ची रुंदी वाढवणे. (२) ADEN/PVR उपविभागांतर्गत रेल्वे वसाहतींमध्ये पोहोच रस्त्याची तरतूद करणे. **कामाची अंदाजित किंमत:** ७५४१३२६२.२६. **बयाणा रक्कम:** ५२७१००.००, **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** ६ महिने. **देखभाल कालावधी:** १२ महिने. **www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** २३.०२.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** २३.०२.२०२६ रोजी १५.३० वाजता. संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो की, या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट: **www.ireps.gov.in** EXP-05
तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा

निलंगा शहरातील
एलआयसर
विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६